सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानमंडळ
# सार्वजनिक उपक्रम समिती

## (२०१३ - २०१४)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्र शासनाच्या सन २००५-२००६ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ", "महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित", "संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, "वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित" आणि "महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक दोन मधील परिच्छेद २.२.७, २.२.१३, २.२.२१, २.२.२२, २.२.२४, २.२.२८, २.२.३२, २.२.३३, २.२.३४, २.२.३५ यावरील समितीचा**

# चौदावा अहवाल

17 JUN 2014

(दिनांक जून २०१४ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई/नागपूर

जून, २०१४

# सार्वजनिक उपक्रम समिती

# (२०१३ - २०१४)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००५-२००६ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ", "महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित", "संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, "वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित" आणि "महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक दोन मधील परिच्छेद २.२.७, २.२.१३, २.२.२१, २.२.२२, २.२.२४, २.२.२८, २.२.३२, २.२.३३, २.२.३४, २.२.३५ यावरील समितीचा

# चौदावा अहवाल

## सार्वजनिक उपक्रम समिती
## (सन २०१३-२०१४)

**समिती प्रमुख**

(१) डॉ. कल्याणराव काळे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. संग्राम थोपटे, वि.स.स.

(३) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(४) श्री. जगन्नाथ शेट्टी, वि.स.स.

(५) श्री. रमेशसिंह ठाकूर, वि.स.स.

(६) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.

(७) श्री. शिरीषकुमार कोतवाल, वि.स.स.

(८) श्री. पंकज भुजबळ, वि.स.स.

(९) श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स.

(१०) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.

(११) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(१२) ॲड. अशोक पवार, वि.स.स.

(१३) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

(१४) श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स.

(१५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(१६) श्री. एकनाथ शिंदे, वि.स.स.

(१७) श्री. महादेव बाबर, वि.स.स.

(१८) श्री.सदानंद चव्हाण, वि.स.स

(१९) श्री. वसंतराव गिते, वि.स.स.

(२०) श्री. विवेक पाटील, वि.स.स.

(२१) श्री. संजय दत्त, वि.प.स.

*(२२) रिक्त

(२३) श्री. दिपक साळुंखे-पाटील, वि.प.स.

**(२४) श्री. किरण पावसकर, वि.प.स.

(२५) डॉ. दिपक सावंत, वि.प.स.

(२६) डॉ. रणजित पाटील, वि.प.स.(निमंत्रित)

(२७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.(निमंत्रित)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

डॉ. अ. ना. कळसे, प्रधान सचिव

श्री. श्रीनिवास जाधव, विशेष कार्य अधिकारी,

श्री. संतोष पराडकर, अवर सचिव,

श्री. श्रीकांत शेटे, कक्ष अधिकारी,

---

* श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांची दिनांक १२ मार्च २०१४ रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्याने सदर जागा रिक्त आहे.

**श्री. विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांची दिनांक १२ मार्च २०१४ रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्याने सदरच्या रिक्त जागी श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# अनुक्रमणिका


| अनु-क्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** .. .. | **सात** |
| | **" लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ", " महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित ", " संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित ", " वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित " आणि " महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित "** (लेखा परीक्षा अहवाल २००५-२००६) | १ |
| १ | **कंपनीच्या लेख्यांना अंतिमरूप देण्यामधील थकीत** (परिच्छेद क्रमांक २.२.७) | १ |
| २ | **प्रशिक्षण संस्थांना प्रदान** (परिच्छेद क्रमांक २.२.१३) | १० |
| ३ | **एका कुटुंबात एक पेक्षा जास्त सभासदांना संवितरण** (परिच्छेद क्रमांक २.२.२१) | १३ |
| ४ | **विहित मर्यादेपेक्षा जास्त संवितरण** (परिच्छेद क्रमांक २.२.२२) | १७ |
| ५ | **योग्य तपासणी न करता कर्जाचे संवितरण** (परिच्छेद क्रमांक २.२.२४) | २० |
| ६ | **मालाच्या प्राप्तीबद्दल खात्री करून न घेताच पुरवठाकाराला संवितरण** (परिच्छेद क्रमांक २.२.२८) | २५ |
| ७ | **लाभधारकांच्या वतीने थेट खरेदी** (परिच्छेद क्रमांक २.२.३२) | ३० |
| ८ | **अपात्र लाभधारकाला अवर्धनक्षम प्रकल्पासाठी संवितरण** (परिच्छेद क्रमांक २.२.३३) | ३३ |
| ९ | **५० टक्के अनुदान सीमांत निधी (मार्जिन मनी) योजने अंतर्गत वित्तीय सहाय्य** (परिच्छेद क्रमांक २.२.३४) | ३९ |
| १० | **पायाभूत सुविधा विकासामधील अनियमितता** (परिच्छेद क्रमांक २.२.३५) | ४४ |
| ११ | **परिशिष्ट** | ४९ |

# प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून महाराष्ट्र शासनाच्या सन २००५-२००६ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ", " महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित ", " संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित ", " वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित " आणि " महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक दोन मधील २.२.७, २.२.१३, २.२.२१, २.२.२२, २.२.२४, २.२.२८, २.२.३२, २.२.३३, २.२.३४, २.२.३५ यावरील समितीचा चौदावा अहवाल (बारावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

या महामंडळांकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे सचिव श्री. रा. द. शिंदे यांची समितीने दिनांक २७ नोव्हेंबर २०१३, २ जानेवारी २०१४, ८ जानेवारी २०१४, १५ जानेवारी २०१४ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

श्रीमती पुनम पांडे, प्रधान महालेखाकार, श्री. आर. वेंकटरमन, उप महालेखाकार, श्रीमती जे. एम. चिंचखंडी, उप महालेखाकार तसेच श्री.एस.व्ही. खेडकर वरिष्ठ लेखा अधिकारी (वाणिज्यिक लेखा परीक्षक) यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे सचिव श्री.रा.द.शिंदे तसेच या महामंडळांचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, यांनी समितीला दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने गुरुवार, दिनांक ५ जून २०१४ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

**विधान भवन,**
मुबई,
दिनांक ५ जून २०१४.

**डॉ. कल्याण काळे,**
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

**“ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ”, “ महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित ”, “ संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित ”, “ वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित ” आणि “ महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित ”**

(सन- २००५-२००६)

**एक - कंपनीच्या लेख्यांना अंतिमरूप देण्यामधील थकीत :—**

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-०६ च्या प्रकरण क्रमांक २ मध्ये परिच्छेद क्रमांक २.२.७- मध्ये “ कंपनीच्या लेख्यांना अंतिमरुप देण्यामधील थकित ” या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, या कंपन्यांमधील भांडवलाच्या स्वरूपातील शासकीय गुंतवणूक अंतिमरूप दिलेल्या अगदी अलिकडच्या वर्षाच्या आधारावरील संचित तोटा व लेख्यांना अंतिमरूप देण्यामधील थकित याबाबतची स्थिती खाली दर्शविलेली आहे :—

(रुपये कोटीत)

| कंपनीचे नांव | ३१ मार्च २००६ रोजीचे भाग भांडवल | अंतिमरूप दिलेल्या अलिकडील वर्षाच्या लेख्यांच्या आधारावरचा संचित तोटा | लेख्यांना अंतिमरूप दिलेले वर्ष | मार्च, २००६ पर्यंतचे थकित लेखे (वर्षात) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| एमपीबीसीडी सीएल | १७२.४१ | . . . | १९९२-९३ | १३ |
| एलएसएबीएसडी सीएल | ५५.६९ | ४६.७८ | १९९०-९१ | १५ |
| वीजेएनटीडी सीएल | ४९.५५ | १४.२१ | १९९४-९५ | ११ |
| एसआरएलआय व सीडी सीएमएल | ४३.२१ | ६६.७६ | १९९४-९५ | ११ |
| एमआरआयएम व्हीव्हीए व्हीएमएल | ३३.८८ | १३.६७ | २०००-०१ | ५ |

शासनाने म्हटले होते की वार्षिक लेखे व वार्षिक अहवाल विनिर्दिष्टीत कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश कंपन्यांना जारी केले होते. परंतु कामामध्ये काहीही प्रगती नव्हती व लेख्यांना अंतिम स्वरूप देण्यामधील थकित कमी करण्यासाठी आणखी भरीव उपाय योजना करणे आवश्यक आहे.

**१.२ महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे अभिप्राय—**

लेखापरीक्षण कालावधीमध्ये सदर परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे महामंडळाचे १३ वर्षाचे लेखे अंतिम होणे थकीत होते. सद्यस्थितीत महामंडळाचे सन २००५-२००६ पर्यंतचे लेखे पूर्ण असून विधीमंडळास पुढीलप्रमाणे सादर करण्यात आले आहेत :—

सन १९९२-९३ ते १९९५-९६ - माहे डिसेंबर, २००८ चे अधिवेशन

सन १९९६-९७ ते १९९७-९८ - माहे डिसेंबर, २००९ चे अधिवेशन

सन १९९८-९९ ते २०००-०१ - माहे जुलै, २०१० चे अधिवेशन

सन २००१-०२ ते २००२-०३ - माहे जुलै, २०११ चे अधिवेशन

सन २००३-०४ ते २००४-०५ -माहे डिसेंबर, २०११ चे अधिवेशन

सन २००५-०६- माहे जुलै, २०१२ चे अधिवेशन

**भरीव उपाय योजना—**

महामंडळाने संचालक मंडळाच्या मान्यतेने सन १९९७-९८ ते २०१०-११ या वर्षाचे लेखे कंपनी कायदा १९५६ मधील तरतुदीनुसार एकत्रित करणे तसेच लेखापरीक्षण करणे यासाठी चार्टर्ड अकाऊंटंटची नेमणूक केली. त्यानुसार त्यांनी सन २००८-०९ पर्यंतचे लेखे पूर्ण केले आहेत व त्यांच्यामार्फत सन २००९-१० ते २०१०-११ पर्यंतचे लेखापरीक्षण चालू आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सन २००५-०६ ते २००८-०९ व २००९-१० ते २०११-१२ या वर्षासाठी संविधानिक लेखापालांची नियुक्ती केलेली आहे. सन २००६-०७ ते २००८-०९ या वर्षाचे महामंडळाचे लेखे संविधानिक लेखापरीक्षकांना सादर करण्यात आले आहेत सन २००६-०७ व २००८-०९ या तीन वर्षाचे लेखे संविधानिक लेखापालांकडून महामंडळास दि. १५ जानेवारी २०१३ अखेर अपेक्षित आहेत. त्यांच्याकडून लेखे प्राप्त होताच महालेखापालांना पुरवणी लेखा परिक्षणासाठी सादर करण्यात येतील.

सन २००९-१० ते २०१०-११ या दोन वर्षाचे संविधानिक लेखापरीक्षण चालू असून संविधानिक लेखापालांकडून या दोन वर्षाचे अहवाल मार्च,२०१३ अखेर प्राप्त होतील असे अपेक्षित आहे.

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे अभिप्राय :—**

| लेख्यांचे वर्ष (१) | लेख्यांचे सद्यस्थिती (२) |
|---|---|
| १९८५-८६ ते २००३-०४ | अहवाल पटलावर ठेवण्यात आलेले आहेत. |
| २००४-०५ | संविधानिक लेखा परिक्षण पूर्ण. महालेखाकार मुंबईकडे प्रलबित. |
| २००५-०६ | सन २००५-०६ या वर्षाचे संविधानिक लेखापरिक्षण सुरू आहे. माहे जाने.२०१३ पर्यंत परिक्षण पूर्ण होईल. |
| २००६-०७ ते २०११-१२ | सन २००५-०६ या वर्षाचे लेखापरिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील वर्षाचे कामकाज सुरू होईल. माहे मार्च २०१३ या अधिवेशनात सन २००६-०७चे लेखे पटलावर ठेवण्यात येतील. |
| अंतर्गत लेखापरिक्षण | महामंडळाचे सन २००९-१० या कालावधीपर्यंत अंतर्गत लेखा परिक्षण पूर्ण झालेले आहे. |

**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे अभिप्राय—**

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (व्हीजेएनटीडीसीएल) यांचे मार्च २००६ पर्यंत थकीत असलेले ११ लेखे अंतीम करून विधान मंडळास सादर करण्यात आलेले आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे :—

| लेख्यांचे वर्ष (१) | विधान मंडळास सादर केलेल दिनांक / महिना (२) |
|---|---|
| १९९५-९६ | २२.१२.२००९ |
| १९९६-९७ | २२.०४.२०१० |
| १९९७-९८ | ०७.१२.२०१० |
| १९९८-९९ | ११.०८.२०११ |
| १९९९-२००० | ११.०८.२०११ |
| २०००-२००१ | २३.१२.२०११ |
| २००१-२००२ | २३.१२.२०११ |
| २००२-२००३ | १३.०४.२०१२ |
| २००३-२००४ | १३.०४.२०१२ |
| २००४-२००५ | १३.०४.२०१२ |
| २००५-२००६ | १३.०४.२०१२ |

महामंडळाचे सन २००६ -०७ ते २०१०-२०११ या वर्षाचे लेख्यांचे संविधानिक लेखा परिक्षण भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी नियुक्त केलेल्या संविधानिक लेखा परिक्षकांकडून सध्या चालू असून. त्यांनी लेखा परीक्षणाचे बहुतांश काम पूर्ण केले आहे. त्यांचेकडून अहवाल प्राप्त करून सर्व लेखे मार्च २०१३ मध्ये होणा-या विधान मंडळ अधिवेशनात सादर करणेसाठी महामंडळ प्रयत्नशील आहे. महामंडळाचे ११ वर्षाचे प्रलंबित असलेले लेखे विशेष मोहिम आखून आणि लेखा परिक्षणाची फी वाढवून पूर्ण करून घेण्यात आले आहे. तसेच पुढील वर्षाचे लेखे सुद्धा पूर्ण करण्याकरीता महामंडळाकडून प्रयत्न चालू आहे.

सन २०११-२०१२ या वर्षाचे लेखे पूर्ण करण्याचे काम सध्या चालू आहे.

**संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे अभिप्राय—**

| अ.क्र. | लेख्यांचे वर्ष | | लेखे कोणत्या अधिवेशनात ठेवण्यात आले ते वर्ष |
|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) |
| १ | १९९४-९५ | . . | हिवाळी अधिवेशन सन २००३ मध्ये |
| २ | १९९५-९६ ते १९९७-९८ | . . | मार्च २०१० |
| ३ | १९९७-९८ | . . | डिसेंबर, २०१२ |
| | १९९८-९९ | . . | |
| | १९९९-२००० | . . | |
| ४ | २०००-०१ | . . | उन्हाळी अधिवेशनात ठेवण्यात येतील |
| | २००१-०२ | . . | |
| | २००२-०३ | . . | |
| | २००३-०४ | | |
| ५ | २००४-०५ | . . | सन २००४-०५ पासून पुढील वैधानिक लेखा परिक्षकांची नियुक्ती CAG कडून नसल्याने मे.एस.पी.रुंगठा, सी.ए. यांची वैधानिक लेखा परिक्षक म्हणून पुर्ननियुक्ती करण्याबाबत मे. रुंगठा यांना विनंती करण्यात येईल. व त्यानंतर सदर लेखे पावसाळी अधिवेशनात ठेवण्यात येतील |
| | २००५-०६ | . . | |

अहवाल वर्षात या महामंडळाच्या वैधानिक लेखापरिक्षणाचे काम सन १९९४-९५ अखेर झाले होते ही वस्तुस्थिती खरी आहे. सदर परिच्छेदात नमूद करण्यात आलेली माहिती बरोबर आहे. महामंडळाचे लेखे ११ वर्षे थकित आहेत असे नमूद करण्यात आलेली बाब खरी आहे. दि. १/७/१९९६ रोजी सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे महामंडळाला विशेष घटक योजनेअंतर्गत योजना राबविण्यासाठी शासनाने कर्मचारी वर्ग दिला नव्हता तसेच नवीन भरती करण्यासही मंजूरी दिली नव्हती. त्यामुळे महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांमधून काही कर्मचा-यांची नियुक्ती विभागीय स्तरावर कार्यालय

सुरू करून करण्यात आली. तसेच या योजना राबविण्यासाठी शासनाने पत्र क्र.चविम-१०९७/प्र.क्र.३६२/ विघयो-२, दि. ११/२/१९९८ रोजी दिलेल्या आदेशानुसार प्रत्येक जिल्ह्यातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळातील कर्मचा-यांची मदत घेऊनच मान्यता दिली. तसेच महामंडळाकडे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांपैकी बरेच कर्मचारी नोकरी सोडून गेले तर काहींचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या रिक्त जागी नवीन कर्मचारी वर्ग नियुक्त न केल्यामुळे व पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे लेखे पूर्ण करण्यांस उशिर झाला. थकित लेखे पूर्ण करण्याच्या दृष्टीने महामंडळ प्रयत्नशील असून लवकरात लवकर लेखे पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आहे.

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे अभिप्राय—**

लेखापरिक्षण कालावधीतमध्ये सदर परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे महामंडळाचे ५ वर्षाचे लेखे अंतिम होणे थकीत होते. सन २००५-०६ पर्यंतचे लेखे पूर्ण असून विधीमंडळास पुढीलप्रमाणे सादर करण्यात आले आहेत. सन २००१-०२ ते सन २००४-०५ माहे जून, २००९ चे अधिवेशन (दिनांक १६-०६-२००९) सन २००५-०६ माहे डिसेंबर, २००९ चे अधिवेशन (दिनांक २२-१२-२००९) सन २०११-१२ चे वार्षिक अहवाल पूर्ण करून विधान मंडळाची मान्यता घेण्यात आलेली आहे.

१.३ १. प्रलंबित लेखे पटलावर शासन स्तरावर वेळोवेळी आढावा घेण्यात आला.

२. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळे वगळता इतर महामंडळांनी लेखे पटलावर ठेवली आहेत.

३. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने सन २००३-०४ पर्यंतचे लेखे पटलावर ठेवले आहेत. तर संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाने सन १९९९-२००० पर्यंतचे लेखे पटलावर ठेवले आहेत.

४. तथापि, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळ हे सन २००३-०४ पर्यंतचे लेखे मार्च १३ च्या अधिवेशनात पटलावर ठेवणेबाबत प्रयत्नशील आहेत.

५. उर्वरीत काही महामंडळांचे लेखे २००९-१० पर्यंतचे लेखे मार्च २०१३ च्या अधिवेशनात ठेवण्याचा प्रयत्न आहे.

६. दरम्यान, पत्र क्र.संकीर्ण २०१३ /प्र.क्र.३२/महामंडळे, दिनांक २१ जानेवारी २०१३ अन्वये संबंधित महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना सूचित करण्यात आले की,

(अ) मार्च, २००६ अखेर प्रलंबित लेखे मार्च, २०१३ पूर्वी अंतिम करावेत तर उर्वरीत कलावधीचे लेखे जुलै, २०१३ पर्यंत अंतिम करावेत.

(ब) प्रलंबित लेखे अंतिम करण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करावा. अनुभवी कर्मचाऱ्यांवर जबाबदारी सोपवावी. लेखे अंतिम करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१.४ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी या महामंडळांच्या कामकाजामध्ये 'कंपनीच्या लेख्यांना अंतिमरुप देण्यामधील थकित' याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समिती साक्ष घेतेवेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव व 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ', 'महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित', 'संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, 'वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित', आणि 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गिय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादितचे' व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने बुधवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१३ रोजी साक्ष घेतली.

समितीने महालेखाकारांनी लेखा परिक्षणामध्ये 'कंपनीच्या लेख्यांना अंतिमरुप देण्यामधील थकित' या संदर्भात घेतलेल्या आक्षेपाबाबत विचारले असता सामाजिक न्याय विभागाचे सचिव, यांनी सांगितले की, कंपन्यांमधील भागभांडवलाच्या स्वरूपातील शासकीय गुंतवणूकीस अंतिमरूप दिलेल्या अगदी अलिकडच्या वर्षाच्या आधारावरील संचित तोटा व लेख्यांना अंतिमरूप देण्यामधील थकीत याबाबतची स्थिती पुस्तिकेमध्ये दर्शविली आहे. मार्च, २००६ पर्यंतचे थकीत लेखे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे १३, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे १५, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे ११, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे ११, आणि महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे ५ आहेत. सन २००५-०६ ची सर्व महामंडळांची स्थिती अवगत करून देतो. सन २००५-०६ मध्ये महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे लेखे जुलै, २०१२ मध्ये सादर केले आहेत. यावर समितीने विचारले की, आपली आजची स्थिती काय आहे ? त्यावर सामाजिक न्याय विभागाचे सचिव, यांनी उत्तर दिले की, सन २००५-०६ मध्ये महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे लेखे जुलै, २०१२ मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाचे लेखे मार्च, २०१३ मध्ये सादर केले आहेत. संत रोहिदास व चर्मकार विकास महामंडळाचे लेख्यांचे संविधानिक लेखापरिक्षण पूर्ण झाले असून ते डिसेंबर, २०१३ मध्ये पटलावर ठेवणार आहोत. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे लेखे एप्रिल, २०१२ मध्ये महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे लेखे डिसेंबर, २००९ मध्ये व अपंग विकास व वित्त महामंडळाचे लेखे एप्रिल, २०११ मध्ये सादर झाले आहेत.

अपंग विकास व वित्त महामंडळाचे लेखे केव्हा सादर करण्यात आले ? असे समितीने विचारले असता त्यावर सामाजिक न्याय विभागाचे सचिव, यांनी उत्तर दिले की, अपंग विकास व वित्त महामंडळाचे लेखे दिनांक १५ एप्रिल, २०११ ला सादर करण्यात आले. संविधानिक लेखापरिक्षण पूर्ण झालेले लेखे महालेखाकारांकडे पाठविण्याबाबतची कार्यवाही सुरू असून ते डिसेंबर, २०१३ च्या अधिवेशनात ठेवण्याचा प्रयत्न करण्यात

येणार आहे. प्रत्येक महामंडळ आपले लेखे विधानमंडळाच्या पटलावर ठेवत आहेत. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्याबाबत बोलायचे झाले तर सन २००६-०७, सन २००७-०८, व सन २००८-०९ चे लेखे मार्च, २०१३ मध्ये सादर झाले आहेत, सन २००९-१०, व सन २०१०-११ चे लेखे डिसेंबर, २०१३ मध्ये ठेवण्यात येणार आहेत. सन २०११-१२, व सन २०१२-१३ या वर्षांच्या लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षणाचे काम सुरू होते, ते संपले आहे.

आता स्टॅच्युटरी ऑडिटची वाट पाहत आहोत. ते येत्या अधिवेशनात पटलावर ठेवण्यात येणार आहेत. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची स्थिती अशी आहे की, सन २००५-०६ चे लेखे मार्च, २०१३ मध्ये पटलावर ठेवण्यात आले आहेत. सन २००६-०७, व सन २००७-०८ च्या लेख्यांचे संविधानिक लेखापरिक्षण पूर्ण झाले असून ते महालेखाकारांकडे पाठविण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. डिसेंबर, २०१३ च्या अधिवेशनात ते लेखे पटलावर ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. सन २००८-०९, व सन २००९-१० या वर्षांच्या लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण पूर्ण झाले आहे. सन २०१०-११, व सन २०११-१२ या वर्षांच्या लेख्यांची अंतर्गत लेखापरिक्षणाची कार्यवाही सुरू आहे. संत रोहिदास व चर्मकार विकास महामंडळाची स्थिती अशी आहे की, सन २००५-०६ च्या लेख्यांचे संविधानिक लेखापरिक्षण पूर्ण झाले असून, ते डिसेंबर, २०१३ मध्ये पटलावर ठेवण्यात येणार आहेत. सन २००६-०७, सन २००७-०८, सन २००८-०९ या वर्षांच्या लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण पूर्ण झाले आहे, संविधानिक लेखापरिक्षण सुरू आहे. सन २००९-१०, सन २०१०-११, व सन २०११-१२ या वर्षाच्या लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण पूर्ण झाले आहे.

सन २०१२-१३ या वर्षाचे लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण सुरू आहे. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचा सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल दिनांक १३ एप्रिल, २०१२ रोजी विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेला आहे. महामंडळाचे सन २००६-०७, २००७-०८ आणि २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण पूर्ण झालेले आहे. महामंडळांचे वार्षिक लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास विलंब झालेला आहे, असे आपल्याला वाटत नाही काय ? महामंडळाचे वार्षिक लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास विलंब होतो, हे कितपत योग्य आहे ? महामंडळाचे ऑडिट पूर्ण करून वार्षिक लेखा अहवाल सभागृहाला सादर करण्यास एवढी उदासिनता असे समजायचे काय की, त्यावेळी महामंडळात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी बोगस कामे करावयाची आणि नंतर ते अधिकारी सेवानिवृत्त होतात किंवा त्यांची बदली होते. मुळात प्रश्न असा आहे की, कंपनीच्या लेख्यांना अंतिम स्वरुप देण्यासाठी विलंब का झाला यासंदर्भात समितीने स्पष्टीकरण विचारले असता याबाबत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, यांनी उत्तर दिले की, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे सन २००८-०९ पर्यंतचे वार्षिक लेखा अहवाल विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेले आहेत. सन २००९-१०, व २०१०-११ या आर्थिक वर्षातील वार्षिक लेखा

अहवाल डिसेंबर, २०१३ मध्ये होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात येणार आहेत. सन २०११-१२, व २०१२-१३ या आर्थिक वर्षातील अंतर्गत लेखा परिक्षणाचे काम पूर्ण झालेले असून स्टॅच्युटरी ऑडिटचे काम सुरू आहे. सन २०११-१२, २०१२-१३ या आर्थिक वर्षातील वार्षिक लेखा अहवाल मार्च, २०१४ मध्ये होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात येतील.

तसेच संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, यांनी सांगितले की, सन २००५-०६ या आर्थिक वर्षातील वार्षिक लेखा अहवाल हिवाळी अधिवेशनात विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात येणार आहेत. स्टॅच्युटरी ऑडिट पूर्ण झालेले आहे. सन २००६-०७, २००७-०८, व २००८-०९ या आर्थिक वर्षातील अंतर्गत लेखापरिक्षण पूर्ण झाले असून संविधानिक लेखापरिक्षणाचे काम सुरू आहे. या तीन वर्षाचे वार्षिक लेखा अहवाल मार्च, २०१४ मध्ये होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात येतील. त्यावर समितीने, ही सर्व महामंडळे सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीत काम करतात. काही महामंडळाचे ऑडिट दिनांक ३१ मार्च, २०१३ पर्यंत अपडेट असते तर मग काही महामंडळांचे ऑडिट ५-६ वर्ष प्रलंबित कसे काय राहते ? अशी विचारणा केली असता संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी महालेखाकार कार्यालयामार्फत ऑडिटरची नियुक्ती वेळेवर केली जात नाही, त्यामुळे ऑडिट प्रलंबित असल्याचे स्पष्ट केले.

यासंदर्भात समितीने काही महामंडळांचे सन २००५-०६ या आर्थिक वर्षातील ऑडिट झालेले नाही. आपण सांगितले की, पुढील वर्षाचा ओपनिंग बॅलन्स कन्सिडर करा तर ते कसे काय करतील. महामंडळाने वार्षिक लेखा अहवाल विधिमंडळाला वेळेवर सादर केले असते तर ही वेळ आली नसती. चार्टर्ड अकाऊंटन्टची नियुक्ती केली नाही, ऑडिट झालेले नाही, असे आता आपण सांगत आहात. मागील दोष कायम ठेवून पुढील वर्षाचे ऑडिट करण्यासाठी ऑडिटरची नियुक्ती केली पाहिजे. ज्यांच्या कार्यकाळात ऑडिट झाले नाही त्यांना कोणती शिक्षा करावयाची याबाबतची तरतूद १९५६ च्या कंपनी ॲक्टमध्ये आहे. हा केंद्र शासनाचा कायदा आहे. त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी, अशी १९५६ च्या कंपनी ॲक्टमध्ये तरतूद आहे. या संदर्भात कोणी पीआयएल दाखल करीत नाही. यासंदर्भात जर कोणी पीआयएल दाखल केली तर महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकावर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल होऊ शकतो. म्हणून महामंडळाचे वार्षिक लेखा अहवाल विधिमंडळाला वेळेवर सादर होतील याकडे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे असे मत व्यक्त केले. यावर वरिष्ठ लेखा परिक्षा अधिकारी (वाणिज्यिक), यांनी सांगितले की, एक वर्ष झाल्यानंतर कंपनीच्या ओपनिंग बॅलन्सची आणि क्लोजिंग बॅलन्सची आकडेवारी आपल्याला कळते.

परंतु ज्यावेळी चार्टर्ड अकाऊंटन्ट ऑडिट करण्यासाठी जातात त्यावेळी महामंडळाची बॅलन्स शीट तयार नसते. आमच्याकडून सप्लीमेंटरी ऑडिट केले जाते. ऑडिटचे दोन प्रकार आहेत. चार्टर्ड अकाऊंटन्ट यांच्याकडून लेख्यांवरील ऑडिट केले जाते आणि आमच्या मार्फत सप्लीमेंटरी ऑडिट केले जाते. जोपर्यंत

क्लोजिंग बॅलन्स फिक्स होत नाही तोपर्यंत चार्टर्ड अकाऊंटन्ट ऑडिट करीत नाहीत. त्यावर समितीने आता ऑडिटरची नियुक्ती केलेली आहे काय ? असे विचारले असता यावर व्यवस्थापकीय संचालक यांनी उत्तर दिले की, सन २००४-०५ ते २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे ऑडिट करण्यासाठी दिनांक १३ जून २०१३ रोजी ऑडिटरची नियुक्ती करण्यात आलेली आहे. समितीने अशी पृच्छा केली की, महामंडळाचे सन २०१३ पर्यंतचे वार्षिक लेखा अहवाल विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात येतील काय ? याबाबत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, यांनी होय असे उत्तर देऊन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे सन २००५-०६ या आर्थिक वर्षापर्यंतचे वार्षिक लेखा अहवाल विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेले आहेत.

सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील ऑडिट करण्यासाठी ऑडिटरची नियुक्ती विलंबाने झाली होती. सन २००६-०७, व २००७-०८ या आर्थिक वर्षातील वार्षिक लेखा अहवाल आम्ही डिसेंबर, २०१३ मध्ये होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्याचा प्रयत्न करीत आहोत. असे सांगितले यावर समितीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे सन २००८-०९ पासून सन २०११-१२ या आर्थिक वर्षापर्यंतचे अंतर्गत लेखापरीक्षण अपूर्ण आहे. अशी विचारणा केली त्यावर सामाजिक न्याय विभागाचे सचिव, यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे सन २००८-०९, व २००९-१० या आर्थिक वर्षातील अंतर्गत लेखापरीक्षण पूर्ण झालेले आहे. सन २०१०-११, व २०११-१२ या आर्थिक वर्षाचे अंतर्गत लेखापरीक्षण सुरू आहे. असे समितीला सांगितले समितीने इंटरनल ऑडिट त्या त्या वर्षी होत नाही काय ? इंटरनल ऑडिट पुढील तीन महिन्यात पूर्ण व्हावयास पाहिजे. सन २०१०-११, व २०११-१२ या आर्थिक वर्षाचे इंटरनल ऑडिट पूर्ण का झालेले नाही. यासंदर्भात स्पष्टीकरण विचारले असता त्यावर सामाजिक न्याय विभागाचे सचिव, यांनी सांगितले की, एका महिन्यात इंटरनल ऑडिट पूर्ण होईल. तसेच याबाबत इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सन २०११-१२ पर्यंतचे वार्षिक लेखा अहवाल विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेले आहेत. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील वार्षिक लेखा अहवाल डिसेंबर, २०१३ मध्ये होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात येतील, असे सांगितले.

तसेच याबाबत वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सन २००५-०६ पर्यंतचे वार्षिक लेखा अहवाल विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेले आहेत. सन २००६-०७, २००७-०८, २००८-०९, २००९-१० आणि २०१०-११ पर्यंतचे वार्षिक लेखा अहवाल डिसेंबर महिन्यात होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात येणार आहेत. सन २०११-१२, २०१२-१३ या आर्थिक वर्षातील वार्षिक लेखा अहवाल मार्च, २०१४ मध्ये होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात येतील, अशी माहिती दिली.

१.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियत्रंक व महालेखापरिक्षक यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व इतर महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र.२.२.७ मध्ये 'कंपनीच्या लेख्यांना अंतिमरूप देण्यामधील थकित ' याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीने साक्ष घेताना असे दिसून आले की, महामंडळाचे वार्षिक लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास विलंब झालेला आहे. तसेच, महामंडळाचे ऑडिट पुर्ण करून वार्षिक लेखा अहवाल सादर करण्यास सर्वच महामंडळे उदासिन असल्याचे स्पष्ट होत आहे. व्यवस्थापकीय संचालकांनी समितीला दिलेल्या माहितीवरून असे निदर्शनास आले की, **महालेखाकारांकडून ऑडिटरची नियुक्ती वेळेवर करण्यात येत नाही. ती वेळेवर करून घेण्यात यावी. मागील वर्षाचे ऑडिट पूर्ण झालेले नाही. म्हणून पुढील वर्षाचे ऑडिट करू नये हे बरोबर नाही. ज्यांच्या कार्यकाळात ऑडिट झाले नाही त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी अशी कंपनी अधिनियम १९५६ च्या कलमामध्ये तरतूद आहे. यासंदर्भात जर कोणी पीआयएल दाखल केली तर महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांवर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल होऊ शकतो. म्हणून समिती अशी शिफारस करते की, महामंडळाचे ऑडिट विहित वेळेवर पूर्ण करून वार्षिक लेखा अहवाल विधीमंडळाला वेळेवर सादर होतील याकडे महामंडळाच्या संचालकांनी गांर्भीयाने लक्ष दिले पाहिजे. तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे सुद्धा सात ते आठ वर्ष ऑडिट झाले नसल्याचे दिसून येते. गोरगरीब जनतेला कर्ज किंवा अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने महामंडळाची स्थापना केलेली आहे. परंतु महामंडळाचे जर सात-आठ वर्षे ऑडिट होत नसेल तर ते योग्य नसून याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.**

**तसेच ज्ञापनांच्या संदर्भात समितीने सन २०१३ मध्ये महामंडळाची साक्ष घेतली आहे, त्याला महामंडळाचा कारभार कारणीभूत आहे. प्रथम महामंडळाने इंग्रजीतून ज्ञापने सादर न करता मराठीतून सादर करण्यात आली होती हे देखील विलंबाचे कारण आहे. यात महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक आणि विभाग प्रमुख यांची जबाबदारी असून पुढील काळात इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेतून ज्ञापने सादर करण्यात यावीत. पाच महामंडळाकडील ज्या महामंडळाची ज्ञापने तयार असतील त्यांनी स्वतंत्रपणे महालेखाकार कार्यालयास सादर करावीत, त्याचप्रमाणे विभागाने बदल करावा. भविष्यात ज्या महामंडळाकडून लेखे सादर करण्यासंदर्भात विलंब होईल त्या महामंडळाच्या संबंधित असलेल्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित विभागामार्फत तीन महिन्यांच्या आत समितीला देण्यात यावी. अशी समिती शिफारस करीत आहे.**

दोन-प्रशिक्षण संस्थांना प्रदान-

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-०६ च्या प्रकरण क्रमांक २ मध्ये परिच्छेद क्रमांक २.२.१३- मध्ये **' प्रशिक्षण संस्थांना प्रदान '** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, परिच्छेद २.२.९ मध्ये चर्चिल्याप्रमाणे एलएसएबीएसडीसीएल ने प्रशिक्षणार्थींना शासकीय/

शासनमान्य संस्थांमध्ये प्रशिक्षण देण्याबाबतच्या शासकीय निर्देशांचे उल्लंघन केलेले होते. शासकीय निधी अशा खाजगी मान्यता नसलेल्या संस्थांना देण्यामध्ये कंपनीचे नियंत्रण नव्हते त्याबाबत खालील परिच्छेदांमध्ये चर्चा केली आहे.

- प्रशिक्षण संस्थांच्या असमाधानकारक कामकाजांबाबत सुरक्षा म्हणून एलएसएबीएसडीसीएल ने त्यांना अग्रिम प्रदान करतांना खाजगी प्रशिक्षण संस्थांकडून बँकहमी/सुरक्षा ठेव किंवा इतर वित्तीय सुरक्षा ठेव घेतली नव्हती. त्या व्यतिरिक्त प्रदान रोखीने/बेअरर धनादेशाद्वारे करण्यात आले ज्याद्वारे शासकीय निधीचे हस्तांतरण सहज शक्य झाले होते.
- ठाणे व औरंगाबाद जिल्हयांमध्ये लेखापरीक्षणाने कंपनी कर्मचा-यांसोबत एप्रिल-मे २००६ मध्ये केलेल्या संयुक्त निरीक्षणामध्ये सहा संस्थांपैकी पाच संस्था अस्तित्वातच नव्हत्या परंतु त्यांना कंपनीच्या कागदपत्रांच्या नोंदीनुसार या संस्थांना २००३-०६ या कालावधीत रुपये २३.३७ लाखाचे प्रदान करण्यात आले होते.(शुल्क : रुपये १५.२० लाख व विद्यावेतन : रुपये ८.१७ लाख) याआधीच्या कागदपत्र नोंदी लेखा परीक्षणाला उपलब्ध करून देण्यात आल्या नव्हत्या.

एलएसएबीएसडीसीएलच्या व्यवस्थापनाने म्हटले (ऑगस्ट २००६) होते की, तपासणीसाठी जिल्हा कार्यालयांकडून मागविण्यात आले होते व त्याबाबतची पुढील प्रगती लेखा परीक्षणाला कळविण्यात येईल.

**२.२ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे अभिप्राय—**

या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे प्रशिक्षण संस्थाना अग्रिम अदा करणेपूर्वी सुरक्षा ठेव म्हणून संस्थांकडून इतर सुरक्षा ठेव घेण्यात आली नव्हती ही बाब सत्य असून काही संस्थांना रोखीने/बेअरर धनादेशाद्वारे प्रदान करण्यात आल्याची बाब सत्य आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाकडून ठाणे व औरंगाबाद येथे केलेल्या लेखापरिक्षणामध्ये कंपनी कर्मचाऱ्यांच्या बरोबर केलेल्या सयुक्त निरीक्षणात ०६ संस्थापैकी ०५ संस्था अस्तीत्वातच नव्हत्या परंतु कंपनीने कागदपत्राच्या नोंदणीनुसार २००३-०४ ते २००५-०६ या कालावधीत या संस्थांना रक्कम रु.२३.३७ लाखाचे प्रदान करण्यात आले होते. सदरची बाब सत्य असून क्षेत्रिय कार्यालयाकडून (प्रादेशिक कार्यालय मुंबई व औरंगाबाद) प्राप्त माहितीनुसार सदर संस्था अस्तीत्वात असल्याचे प्रा.व्य. यांनी कळविले आहे. मात्र त्यासोबत दस्तऐवज जोडण्यात आले नाहीत. सदर संस्था कागदोपत्री अस्तीत्वात होत्या परंतू सदर संस्थांनी महामंडळामार्फत मिळालेल्या प्रशिक्षणार्थीना इतर प्रशिक्षण संस्थामार्फत प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करून घेतल्याचे दिसून येते. सदर संस्था कागदोपत्री असल्याचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांना सुद्धा अवगत होते. त्यावेळी श्री. स्वर्गीया हे व्यवस्थापकीय संचालक होते. त्यांनी त्यांचे अधिकारात अशा संस्थाना प्रशिक्षणार्थीची मंजूरी दिलेली आहे. सदरची बाब देखिल तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांच्या विभागीय चौकशीत घेण्यात आलेली आहे. सद्या त्यांची शासनस्तरावरुन उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेल्या बाबी अंर्तभूत असून शासनामार्फत विभागीय चौकशी सुरू आहे.

२.३ श्री. स्वर्गीया तत्कालीन उप सचिव हे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास मंडळात व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत असताना त्यांनी केलेल्या अनियमिततेबाबत त्यांच्या विरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा नियम ८ अन्वये दोषारोप बजावून विभागीय चौकशी सुरू केली आहे. शासन आदेश दि.२०/०३/ २००७ अन्वये सदर प्रकरणी चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे.

२.४ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी या महामंडळांच्या कामकाजामध्ये "प्रशिक्षण संस्थांना प्रदान" याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायाबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव, संबंधीत महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने बुधवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१३ रोजी साक्ष घेतली.

समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये प्रशिक्षण संस्थांना महामंडळाने केलेल्या प्रदानाबाबत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात सदरहू चौकशी ठराविक दिवसांमध्ये पूर्ण करण्याचे त्यांच्यावर बंधन घातलेले आहे काय ? श्री.स्वर्गीया हे सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचे निवृत्तीवेतन थांबविले आहे काय ? अशी विचारणा केली असता यावर सामाजिक न्याय विभागाचे सचिव यांनी सांगितले की, सहा महिन्यांत चौकशी पूर्ण व्हावयास पाहिजे होती. परंतु मधल्या काळात सादरकर्ता अधिकारी, चौकशी अधिकारी बदलल्यामुळे विलंब झालेला आहे. त्यांना प्रोव्हिजनल पेन्शन दिली जाते अशी माहिती मिळाली आहे, परंतु याबाबत मी खात्री करून घेतो. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, श्री. स्वर्गीया हे सेवानिवृत्त आहेत. त्यांना निवृत्तीवेतन दिले जात असेल तर ते बंद केले पाहिजे. यावर व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, श्री.स्वर्गीया यांच्या विरुद्ध सुरू असलेली विभागीय चौकशी आता अंतिम टप्प्यावर आलेली आहे. एक ते दीड महिन्यात ती पूर्ण होईल असे वाटते. काही कारणामुळे चौकशी अधिकारी बदलत गेले. त्यानंतर दिनांक २०.३.२०१३ रोजी त्यांच्याकडे हे काम देण्यात आले आहे.

**२.५ अभिप्राय व शिफारसी :—**

भारताचे नियत्रंक व महालेखापरिक्षक यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व इतर महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र.२.२.१३ मध्ये 'प्रशिक्षण संस्थांना प्रदान' याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीने साक्षीच्या वेळेची वस्तुस्थिती विचारात घेता महामंडळे ही स्वायत्त असल्याने त्यांनी **प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचे मुल्यमापन करून या क्षेत्रात अनुभवी व प्रतिष्ठीत असणाऱ्या प्रशिक्षण संस्थांची निवड करणे तसेच केंद्र शासनाने नेमून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता असताना देखील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण संस्थांना मंजूरी देण्यात आली असून त्यांना त्याचे संनियंत्रण करता आलेले नाही. त्यातील प्रमुख बाबी म्हणजे प्रशिक्षण देणारी संस्था पात्र अपात्र याची शहानिशा न करणे प्रशिक्षण संस्थांना देण्यात येणारा मेहताना न देणे, प्रशिक्षण संस्थांनी सादर केलेल्या हजेरी पत्रकावर प्रत्येक दिवसाच्या उमेदवारांच्या सह्या न घेणे असे अनेक गैरप्रकार समितीच्या निदर्शनास आले आहेत. सदर बाब गंभीर स्वरुपाची असून समितीने याबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली.**

**याप्रकरणी सन २००७ साली सुरू करण्यात आलेली व्यवस्थापकीय संचालकांविरोधातील विभागीय चौकशी सहा महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित असताना देखील अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नाही. तसेच तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री.स्वर्गीया हे शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत व त्यांना प्रोव्हीजनल पेन्शन दिली जाते. सदरचे निवृत्तीवेतन दिले जात असेल तर ते बंद केले पाहिजे, असे समितीचे मत आहे. तसेच विभागीय चौकशी लवकरात लवकर पूर्ण करावी व यावर केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**तीन - एका कुटुंबात एक पेक्षा जास्त सभासदांना संवितरण :—**

**३.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-०६ च्या प्रकरण क्रमांक २ मध्ये परिच्छेद क्रमांक २.२.२१- मध्ये **'एका कुटुंबात एक पेक्षा जास्त सभासदांना संवितरण'** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, लक्षित गटामधील जास्तीत जास्त कुटुंबाचा समावेश करण्यासाठी एका कुटुंबामधील एकाच व्यक्तीला वित्तीय सहाय्याची तरतूद करावयाची होती. लेखापरीक्षण छाननीत असे निदर्शनास आले की एका कुटुंबातील एकापेक्षा जास्त व्यक्तींना वित्तीय सहाय्य देण्यात आले होते.

**व्हीजेएनटीडीसीएलच्या नांदेड व लातूर जिल्हयांमधील लाभधारक जिल्हा व्यवस्थापकांशी संबंधात असल्याचे निदर्शनास आले होते. वित्तीय सहाय्य धनादेशाद्वारे द्यावयाचे असताना ते रोख रकमेत देण्यात आले होते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे होता :—**

| कंपन्याचे नांव | जिल्ह्याचे नांव | वर्ष | कुटुंबाची संख्या | कुटुंब सदस्यांची संख्या | संवितरित करण्यात आलेले वित्तीय सहाय्य (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| व्हीजेएनटी | नांदेड | २००४-०५ | १२ | १८ | २४.०२ |
| डीसीएल | लातूर | २००२-०५ | १ | ३ | ४.३८ |
| | अहमदनगर | २००१-०२ | १ | २ | ५.२५ |
| एमपीबीसी डीसीएल | नंदुरबार | २००१-०४ | ३ | ७ | ०.७० |

व्हीजेएनटीडीसीएलच्या व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै, २००६) की जिल्हा व्यवस्थापकांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्यात आली होती.

३.२ महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे अभिप्राय—

प्रस्तुत प्रकरणी लेखापरिक्षणात नमूद केलेल्या नंदुरबार जिल्ह्यातील ३ कुटुंबातील ७ जणांना महामंडळामार्फत वित्तीय सहाय्य केल्याचे नमूद केले आहे. सदर सातही प्रकरणाची पुर्नविलोकन केले असता त्यामध्ये सर्वांचे रेशनकार्ड वेगळे असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब सदर व्यक्ती एकाच कुटुंबातील नाहीत, किंबहुना विभक्त आहेत असे समजण्यांस वाव आहे.

१. नांदेड - या लाभार्थींचे प्रकरणी (१८ लाभार्थी) चौकशी करण्यात येऊन संबंधित जिल्हा व्यवस्थापका विरुद्ध प्रशासकीय कार्यवाही करून त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

२. लातूर - या लाभार्थींचे प्रकरणी (३ लाभार्थी) संबंधित जिल्हा व्यवस्थापकाने खुलासा केल्यानुसार दोन लाभार्थी एका कुटुंबातील असून तिसरा लाभार्थी विभक्त कुटुंबातील आहे व त्यांचे रेशनकार्ड वेगळे आहे. दोन लाभार्थी प्रकरणी पती-पत्नी असून भूकंपग्रस्त असल्याने त्यांनी सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून कर्जाचे वितरण झालेले आहे व त्यातील पतीकडून कर्जाची पूर्ण परतफेड झालेली आहे. संबंधित जिल्हा व्यवस्थापकांना एकाच कुटुंबातील एकाहून जास्त व्यक्तीला कर्जाचे वाटप करण्यात येऊ नये याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत.

३. अहमदनगर - या लाभार्थींचे प्रकरणी (३ लाभार्थी) संबंधित जिल्हा व्यवस्थापकाने खुलासा केल्यानुसार एकाच कुटुंबातील पती-पत्नींना नजर चुकीने कर्जाचे वाटप करण्यात आले असून त्यापैकी पत्नीकडून कर्जाची परतफेड झाली आहे. झालेल्या चुकीबद्दल त्यांनी दिलगीरी व्यक्त केली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारची चूक होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल असे कळविले आहे. या अनियमिततेबाबत महामंडळाच्या सर्वच जिल्हा व्यवस्थापकांना अशा प्रकारची चूक भविष्यात होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**३.३** वित्तीय सहाय्य मंजूर करताना अर्जाची सखोल छाननी करणेबाबत तसेच पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या अर्जदारांना वित्तीय सहाय्य मंजूर करणेबाबत संबंधित महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना पत्र.क्र.संकीर्ण २०१३ / प्र.क्र.३२ / महामंडळ- दि.१९.१.२०१३ अन्वये कळविण्यात आले आहे.

**३.४** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी या महामंडळांच्या कामकाजामध्ये "एका कुटुंबात एक पेक्षा जास्त सभासदांना संवितरण" याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायाबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव, संबंधित महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने गुरुवार, दिनांक २ जानेवारी, २०१४ रोजी साक्ष घेतली.

समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये घेतलेल्या आक्षेपासंबंधाने विचारले की, एकाच कुटुंबात एकापेक्षा जास्त सभासदांना वित्तीय सहाय्य देण्यात आले आहे त्याबाबत खुलासा करण्यात यावा. त्याबाबत विभागीय प्रतिनिधी यांनी उत्तर दिले की, नंदूरबार जिल्ह्यातील ३ कुटुंबातील ७ जणांना महात्मा फुले

मागासवर्ग विकास महामंडळामार्फत वित्तीय सहाय्य केल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी अवलोकन केले असता पाच जणांची वेगवेगळी रेशनकार्ड आहेत तर सहाव्या रेशनकार्डावर दोन नावे आहेत आणि त्या दोन्ही व्यक्ती १८ वर्षावरील असल्यामुळे त्यांना स्वतंत्र धरलेले आहे. अशाप्रकारे पाच अधिक दोन अशा एकूण सात व्यक्तींना सहाय्य केलेले आहे. सन २००५-२००६ मध्ये हा प्रकार घडला आहे. महामंडळाच्या विविध योजनांसाठी १८ वर्षावरील व्यक्तीला स्वतंत्र कुटुंब म्हणून समजण्यात यावे असे शासनाचे परिपत्रक आहे. यावर समितीने असे विचारले की, एकाच कुटुंबातील व्यक्तींना लाभ दिलेला आहे. एका कुटुंबातील किती व्यक्तीला वित्तीय लाभ देण्यात येतो त्याबाबत विभागीय प्रतिनिधी यांनी उत्तर दिले की, हा आक्षेप महालेखाकार कार्यालयाने काढलेला आहे. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला वित्तीय लाभ देण्यात येतो. परंतु हे कुटुंब वेगवेगळे आहे.

ऑडीट पॅरा आल्यानंतर वेगवेगळी रेशनकार्ड काढण्यात आली असावीत. कारण हे प्रकरण २००६ मधील आहे आणि आता सात वर्षांनंतर त्याबाबत सुनावणी घेत आहोत. याबाबत तपासणी करण्यात आली आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधी यांनी रेशनकार्डस जुनी आहेत. दोन व्यक्तींची नावे एका रेशनकार्डवर होती आणि त्या दोन्ही व्यक्ती १८ वर्षावरील आहेत. शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे १८ वर्षावरील व्यक्तीला स्वतंत्र कुटुंब समजले जाते. त्यामध्ये कोणताही फेरफार केलेला नाही, ही वस्तुस्थिती असल्याचे समितीला स्पष्ट केले.

समितीने शासनाच्या परिपत्रकान्वये १८ वर्षावरील व्यक्तीला स्वतंत्र लाभधारक समजावे, असे शासनाचे धोरण असले तरी आपण एकाच कुटुंबातील दहा व्यक्तींना लाभ देणार काय तसेच अहमदनगर जिल्ह्यामध्ये एकाच कुटुंबातील पती-पत्नीला कर्ज वाटप केलेले आहे. लाभार्थ्यांकडून कर्जाची वसुली झाली नसेल तर त्यांच्यावर कोणती कारवाई करणार याबाबत खुलासा करण्यात यावा. यावर विभागीय प्रतिनिधी यांनी ज्या लाभार्थ्यांना वित्तीय लाभ देण्यात आला त्यांची वेगवेगळी रेशनकार्डस आहेत. लाभार्थ्यांकडून कर्जाच्या वसुलीच्या दृष्टीने माफीपर्यंत जितकी वसुली करता येत होती तितकी केलेली आहे. असा खुलासा केला. याच संदर्भात विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी पुढील अधिक खुलासा केला. लातूर येथे एकाच कुटुंबातील पती-पत्नीला कर्ज दिलेले आहे. सदर प्रकरणी पतीकडून कर्जाची पूर्ण परतफेड झालेली आहे. पती-पत्नी भूकंपग्रस्त असल्याने त्यांना सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून कर्जाचे वाटप करण्यात आले. यावर समितीने विचारले की, भूकंपग्रस्तांना सहानुभूती दाखविली ही बाब सत्य नाही. खरे म्हणजे अधिकाऱ्यांची चूक झाली आहे आणि म्हणून अधिकाऱ्यांच्या चुकीवर पांघरुण घालण्यासाठी हे आता स्पष्ट करण्यात येते आहे. भूकंपग्रस्तांना झुकते माप द्यावे असे शासनाचे परिपत्रक आहे काय यावर विभागीय प्रतिनिधी यांनी उत्तर दिले की, भूकंपग्रस्तांसाठी नोकरीमध्ये आरक्षण दिलेले आहे.

सदर प्रकरणी अधिकाऱ्यांनी चूक केलेली असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई केली काय ज्याप्रमाणे नांदेडमध्ये जिल्हा व्यवस्थापका विरुद्ध निलंबनाची कारवाई केलेली आहे. मग लातूर येथे संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई का केली नाही ? अशी समितीने विचारणा केली असता विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केलेली आहे. त्यांना एका दिवसासाठी निलंबित केले असल्याचे सांगितले यासंदर्भात समितीने नांदेड प्रकरणामध्ये ज्या अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई केली होती ते अजून निलंबित आहे काय अशी विचारणा केली असता विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी त्यांना सहा महिन्यानंतर कामावर घेण्यात आले असल्याचे स्पष्ट केले. त्यावर नांदेड आणि लातूर प्रकरणामध्ये संबंधितांवर कारवाई केली. परंतु अहमदनगर प्रकरणामध्ये कोणावरही कारवाई केलेली नाही. एका प्रकरणात कारवाई केली तर दुसऱ्या प्रकरणात कारवाई केलेली नाही. एका कुटुंबातील एका व्यक्तीला लाभ मिळाला तर ती लोककल्याणकारी योजना होऊ शकेल. परंतु एखाद्याच्या घरी दहा जण आहेत व त्यांची अधिकाऱ्यांपर्यंत चांगली ओळख आहे म्हणून त्या घरातील दहा जणांना लाभ मिळत असेल व त्यामुळे उद्दीष्ट पूर्ण होत असेल अशा परिस्थितीत इतर कुटुंबातील एकाही व्यक्तीला लाभ मिळत नसेल तर ते योग्य नाही. थोडक्यात या चुकीमध्ये ९ जणांना लाभ मिळत नसेल तर ते चुकीचे आहे. भविष्यात असे प्रकार होऊ नयेत याची काळजी घ्यावी. शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे १८ वर्षावरील व्यक्तीला स्वतंत्र लाभ देण्यास हरकत नसावी. परंतु एकाच कुटुंबातील पती-पत्नीला एकच समजले पाहिजे. सर्वांना समान न्याय मिळेल या दृष्टीने काम केले पाहिजे, असे समितीने निर्देश दिले.

जिल्हा व्यवस्थापकाविरुद्ध कारवाई केलेली आहे. अशा प्रकरणामुळे व्यवस्थापकीय संचालकांना देखील निलंबित केले पाहिजे. महामंडळाचे ते प्रमुख असतात. त्यांनी महामंडळाचे प्रमुख म्हणून काय काम पाहिले अधिकाऱ्यांसोबत व्यवस्थापकीय संचालक यांना देखील निलंबित करावे असे स्पष्ट निर्देश दिले याच संदर्भात पुरविण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने असे निदर्शनास आणले की, "महामंडळाच्या सर्वच जिल्हा व्यवस्थापकांना अशाप्रकारची चूक भविष्यात होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत" अधिकाऱ्यांनी कोणतेही निकष न पाहता लाभार्थ्यांना अनुदान दिल्यामुळे सरकारला त्यांची कर्जे माफ करावी लागली. त्यामुळे शासनाचा महसूल बुडालेला आहे. यावर विभागीय प्रतिनिधी यांनी उत्तर दिले की, जिल्हा व्यवस्थापकाविरुद्ध ॲक्शन घेत आहोत. व्यवस्थापकीय संचालकांकडे चौकशी अहवाल आलेला आहे. लातूर आणि अहमदनगरमध्ये जिल्हा व्यवस्थापकांनी अनियमितता केलेली आहे. त्या संदर्भात कारवाई करीत आहोत. त्याचा अहवाल समितीला देण्यात येईल.

**३.५ अभिप्राय व शिफारस :—**

भारताचे नियत्रंक व महालेखापरिक्षक यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व इतर महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र.२.२.२१ मध्ये "एका कुटुंबात एक पेक्षा जास्त सभासदांना

संवितरण" याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीला शासनाकडून व महामंडळाकडून मिळालेली लेखी व तोंडी माहिती विचारात घेता असे दिसून येते की, **एका कुटूंबात एक पेक्षा जास्त व्यक्तीला वित्तीय सहाय्याची तरतुद देण्यात आली आहे. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत पाच जणांची वेगवेगळी रेशनकार्ड असलेल्या तसेच सहाव्या रेशनकार्डामध्ये दोन नावे असलेल्या नंदूरबार जिल्ह्यातील ३ कुटुंबातील ७ व्यक्तींना वित्तीय सहाय्य दिले गेले आहे. या संदर्भात समितीने आक्षेप घेतला असून शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे १८ वर्षा वरील व्यक्ती असल्यास स्वतंत्र समजून एकाच कुटुंबातील लाभार्थ्यांना कर्ज देणे योग्य होणार नाही तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाने एकाच कुटूंबातील पती-पत्नीना भुकंपग्रस्त म्हणून कर्ज दिले आहे. असे शासनाचे परिपत्रक नसतानाही कर्ज देऊन अधिकाऱ्यांनी चूक केली आहे. अशाप्रकारे जर लाभार्थ्यांची निवड केली तर एकाच कुटुंबातील व्यक्तींना त्या योजनेचा लाभ मिळून इतर पात्र लाभार्थ्यांना त्याचा लाभ होणार नाही. अशाने ती योजना लोककल्याणकारी योजना होऊ शकणार नाही, असे समितीचे मत आहे.**

**या प्रकरणी नांदेड व लातूर जिल्हा व्यवस्थापक यांच्यावर निलंबाची कारवाई करण्यात आली परंतु अहमदनगर जिल्ह्यातील व्यवस्थापक यांच्यावर कोणतीही कारवाई केली गेली नाही याचे समितीला आश्चर्य वाटते. एवढे होऊनही व्यवस्थापकीय संचालकांनी या प्रकरणी कोणतीही जबाबदारी निश्चित केली नाही एकंदरीत या प्रकरणी संचालकांचा निष्काळजीपणा कारणीभूत आहे, भविष्यात अशा प्रकारे चुका होणार नाहीत. याची दक्षता व्यवस्थापकीय संचालक व विभागाचे प्रमुख म्हणून सचिवांनी घेणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील व्यवस्थापक यांनी कोणतेही निकष न पाहता लाभार्थ्यांना अनुदान दिल्याने शासनाला त्याची कर्जे माफ करावी लागली त्यामुळे शासनाचा महसुल बुडालेला आहे. या संदर्भात व्यवस्थापकीय संचालकांची सखोल चौकशी करण्यात यावी, महामंडळाचे प्रमुख म्हणून त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांना निलंबित करण्यात यावे, या प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा. अशी समिती शिफारस करीत आहे.**

**चार - विहित मर्यादेपेक्षा जास्त संवितरण :—**

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-०६ च्या प्रकरण क्रमांक २ मध्ये परिच्छेद क्रमांक २.२.२२ मध्ये **'विहित मर्यादेपेक्षा जास्त संवितरण'** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, निकषानुसार थेट वित्तीय सहाय्य योजने अंतर्गत जास्तीत जास्त रुपये २५,००० एवढी रक्कम मंजूर करावयाची होती व वित्तीय सहाय्य एका कुटुंबामधील एका व्यक्ती पुरतेच मर्यादित होते. या निकषांचे उल्लंघन करून व्हीजेएनटीडीसीएलच्या औरंगाबाद कार्यालयाने रुपये ५.५. लाखाचे वित्तीय सहाय्य एकाच कुटुंबामधील दोन व्यक्तींना संवितरित केले होते.

व्हीजेएनटीडीसीएलच्या व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै २००६) की भविष्यामध्ये याबाबत काळजी घेण्यात येईल. चुकीसाठी जबाबदार असलेल्या व्यक्ती विरुद्ध काय कारवाई करण्यात आली याबाबत उत्तरात काहीही म्हटले नव्हते.

४.२ वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे अभिप्राय—

या महामंडळाशी संबंधित जिल्हा व्यवस्थापक, औरंगाबाद यांनी खुलासा केल्यानुसार रु.२.५० लाख वित्तीय सहाय्य एकाच कुटुंबातील दोन व्यक्तींना संवितरीत करण्यात आलेले नाही. या दोन व्यक्तींमधील सौ.मीराबाई देवीदास रावलकर यांना राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या सर्वसाधारण योजनेअंतर्गत प्रथम रु.२५,०००/-चे वित्तीय सहाय्य भांडी व्यवसायाकरिता देण्यात आले होते. त्यांचा व्यवसाय चांगल्या प्रकारे चालू झाल्याने त्यांना वितरित केलेले वित्तीय सहाय्य (भांडवल) अपुरे पडल्यामुळे त्यांनी विनंती केल्यानुसार त्यांना वरील योजने अंतर्गत आणखी तीन लाखाचे वित्तीय सहाय्य देण्यात आले. अशा प्रकारे त्यांना एकाच योजनेअंतर्गत एकूण रु.३.२५ लाख कर्ज वितरण करण्यात आले. राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळाच्या या योजनेअंतर्गत रु.५.०० लाखापर्यंत कर्ज मंजूर करण्याची मर्यादा असल्याने या प्रकरणी विहीत मर्यादेपेक्षा जास्त संवितरण झालेले नाही.

उपरोक्त योजनेअंतर्गत श्रीमती धोंडाबाई बद्री रावलकर यांना स्टील फर्नीचर व्यवसायाकरिता रु.२.०० लाखाचे कर्ज वितरण करण्यात आले आहे. त्यांचे श्रीमती मीराबाई देवीदास रावलकर व श्रीमती धोंडाबाई बद्री रावलकर ह्या दोन्ही व्यक्ती वेगवेगळया कुटुंबातील आहेत.

महाराष्ट्र शासनाची बीज भांडवल योजनेअंतर्गत रु.२५,०००/- मर्यादा असलेली थेट कर्जयोजना असून या योजनेअंतर्गत उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेल्या दोन्ही व्यक्तींना कर्जाचे वाटप झालेले नाही. जिल्हा व्यवस्थापक यांनी केलेला उपरोक्त खुलासा विचारात घेता या प्रकरणी कोणतीही अनियमितता झालेली नाही.

४.३ वित्तीय सहाय्य मंजूर करताना अर्जाची सखोल छाननी करणेबाबत तसेच पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या अर्जदारांना वित्तीय सहाय्य मंजूर करणेबाबत संबंधित महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना पत्र.क्र.संकीर्ण २०१३/प्र.क्र.३२/महामंडळ, दिनांक १९ जानेवारी २०१३ अन्वये कळविण्यात आले आहे.

४.४ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी या महामंडळांच्या कामकाजामध्ये 'विहित मर्यादेपेक्षा जास्त संवितरण' याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायाबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव, संबंधित महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने गुरुवार, दिनांक २ जानेवारी, २०१४ रोजी साक्ष घेतली.

समितीने महालेखाकारांनी लेखा परिक्षणामध्ये घेतलेल्या आक्षेपासंबंधाने सन २००५ मध्ये आपण किती लाभार्थींना रक्कम रूपये पाच लाख, तीन लाख, दोन लाख देण्यात आली आहे, यासंबंधातील यादी आहे काय ? अशी विचारणा केली असता विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी यासंबंधी होय असे उत्तर देऊन महामंडळाची चूक झाली आहे हे निश्चित असल्याचे सांगितले. मायक्रो योजनेसाठी रूपये २५ हजार आणि मेजर योजनेसाठी रूपये ५.०० लाख कर्ज देता येते त्याप्रमाणे पाच लाख रूपयांचे वाटप किती लाभार्थींना केले आहे, ते कोणत्या जिल्ह्यातील आहेत, एकूण

लाभार्थींपैकी किती लाभार्थींनी कर्जाची परतफेड केली आहे. पाच लाख रूपयांचे कर्ज देण्यासंबंधातील अटी व शर्ती काय आहेत ? याबाबतचा खुलासा समितीने विचारला असता विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी लाभार्थींकडून पोस्ट डेटेड चेक व जामिनदार घेण्यात येतात. केंद्र शासनाच्या योजनेतील ८ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. एकूण १३४१ लाभार्थी होते.

केंद्र शासनाने ५०० लाख रूपये दिलेले आहेत. कर्जवाटप करताना लॉटरी पद्धतीने लाभार्थींची निवड करण्यात येत असल्याचे सांगितले असता, समितीने राज्य शासनाच्या पैशातून महामंडळाने आतापर्यंत किती निधीचे वाटप केले आहे ? अशी विचारणा केली, यावर विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी यावर्षीचा केंद्र शासनाचा निधी व राज्य शासनाची हमी रक्कम मिळालेली नाही, राज्य शासनाकडून १८ कोटी रूपये येणे अपेक्षित आहे, असे असले तरी महामंडळाने स्वतःच्या निधीतून रुपये १४ कोटी ४० इतक्या रकमेचे वाटप लाभार्थींना केले आहे. राज्यातील एकूण २१०० लाभार्थींना कव्हर केले आहे. महामंडळाने आतापर्यंत राज्य शासनाच्या निधीतून रकमेचे वाटप केलेले नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी सदर निधीचे वाटप बँकेमार्फत केले आहे, अशी माहिती दिली. सदर माहितीबाबत समितीने आक्षेप घेऊन जिल्हाधिकारी यांनी बँकेमार्फत निधीचे वाटप केले असले तरी राज्य शासनाचा निधी आलेला असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत निधीचे वाटप करण्यात आलेले आहे असे समितीचे मत आहे. शासनाच्या निधीतून महामंडळाने आतापर्यंत निधीचे वाटप केले नाही या आपल्या विधानाशी आपण अजूनही ठाम आहात काय ? यावर विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी होय, असे उत्तर दिले.

### ४.५ अभिप्राय व शिफारस :-

भारताचे नियत्रंक व महालेखापरीक्षक यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व इतर महामंडळांच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र.२.२.२२ व २.२.२३ मध्ये 'विहित मर्यादेपेक्षा जास्त संवितरण' याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीला साक्षीच्या वेळी मिळालेली लेखी व तोंडी माहिती विचारात घेता असे दिसून येते की, **वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाची व राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ यांना केंद्र शासनाच्या सर्वसाधारण योजनेंतर्गत जास्तीत जास्त रुपये २५.००० एवढी रक्कम वित्तीय सहाय्य एका कुटूंबातील एका व्यक्तीस देण्याची मर्यादा होती. या निकषांचे उल्लंघन करून औरंगाबाद कार्यालयाने रुपये ५.५ लाखांचे कर्ज मंजूर केले आहे. हे कर्ज देण्यासंबंधी अटी व शर्तीचा उल्लंघन करून कर्ज वाटप केल्याचे समितीचे मत आहे. केंद्र शासनाच्या योजनेतून ८ हजार प्रकरणापैकी १३४१ लाभधारकांसाठी केंद्र शासनाकडून ५०० लाख रूपये इतके वित्तीय सहाय्य महामंडळाला मिळाले होते व महामंडळाच्या निधीतून १४ कोटी ४० इतक्या रकमेचे वाटप लाभार्थ्यांना केले आहे. परंतु महामंडळाला केंद्र शासनाच्या निधीकरिता राज्य शासनाची हमी रक्कम मिळालेली नाही. अतः भविष्यात अशी वेळ उद्‌भऊ नये आणि जास्तीत जास्त लाभार्थ्यांना सहाय्य निधी उपलब्ध होऊ शकेल या दृष्टीने शासनाने देखील जास्तीत जास्त काळजी घ्यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**पाच - योग्य तपासणी न करता कर्जाचे संवितरण :—**

५.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या प्रकरण क्रमांक २ मध्ये परिच्छेद क्रमांक २.२.२४- मध्ये " **योग्य तपासणी न करता कर्जाचे संवितरण** " या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, २००४-२००६ या कालावधीत एसआरएलआय व सीडीसीएमएल या कंपनीने अहमदनगर जिल्ह्यांमधील १८ लाभधारकांना रुपये १५.५० लाखांचे वित्तीय सहाय्य संवितरित केले होते त्यापैकी सात लाभधारक अस्तित्वातच नव्हते व उर्वरित ११ लाभधारकांनी बनावट कागदपत्रे सादर केली होती. त्याचप्रमाणे व्हीजेएनटीडीसीएल यांनी अहमदनगर व जळगाव जिल्ह्यांमधील तीन लाभधारकांना रुपये ०.८६ लाखाचे वित्तीय सहाय्य संवितरित केले होते (२००१-२००४) त्यांनी बनावट कागदपत्रे सादर केली होती.

एसआरएलआय व सीडीएमएलच्या व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै,२००६) की, जिल्हा व्यवस्थापकाविरुद्ध कारवाई सुरू करण्यात आली होती व वसुली दावा दाखल करण्यात आला होता.

लेखापरीक्षणाच्या सांगण्यावरुन कंपनी कर्मचाऱ्यांनी केलेल्या संयुक्त तपासणीत असे आढळून आले की, खाली दर्शविल्याप्रमाणे वित्तीय सहाय्य दिलेल्या चार लाभधारकांची दुकाने/सायबर कॅफे अस्तित्वातच नव्हते :—

| कंपनीचे नांव | लाभधारकांची संख्या | वित्तीय सहाय्य (रुपये लाखांत) | हेतू | तपासणीची तारीख | वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| एमआरआयएमव्ही व्हीएव्हीएमएल, पुणे | १ | ०.५५ | किराणा दुकान | ११ फेब्रु.२००५ | २००१-०२ |
| एमपीबीसीडी-सीएल, नाशिक | २ | ३.३५ | किराणा दुकान व सायबर कॅफे | २७ मे २००६ | २००४-०५ |
| एलएसएबीएसडी सीएल, नाशिक | १ | २.२५ | सायबर कॅफे | २८ मे २००६ | २००४-०५ |
| एकूण | ४ | ६.१५ | | | |

एमआरआयएमव्हीव्हीएव्हीएमएल यांनी जिल्हा व्यवस्थापकांनी विनिर्दिष्टित केलेल्या संवितरण पूर्व तपासणी न केल्याची बाब मान्य केली होती (जुलै,२००६). एलएसएबीएसडीसीएलने म्हटले होते (ऑगस्ट, २००६) की नाशिक कार्यालयाकडून माहिती मागविण्यात येत आहे.

५.२ **महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे अभिप्राय—**

प्रत्यक्ष भेट दिली त्यावेळी या महामंडळाशी संबंधित दोन लाभधारकांची किराणा दुकाने व सायबर कॅफेची दुकाने उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले असले तरी त्यांनी महामंडळाकडून मिळालेल्या निधीतून अन्य व्यवसाय सुरू केले असल्याची खात्री करण्यात आली आहे. आतापर्यंत त्यांच्याकडून वसुली नियमित चालू आहे, त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी महामंडळाचे नुकसान झाले आहे असे म्हणता येणार नाही.

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे अभिप्राय—**

सदर परिच्छेदात दर्शविण्यात आल्यानुसार योग्य तपासणी न करता कर्जाचे वितरण करण्यात आले आहे. या संदर्भात नाशिक येथील एका लाभधारकाचा व्यवसाय अस्तित्वात नसल्याचे दिसून आले आहे. सदरची बाब सत्य आहे.

**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे अभिप्राय—**

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (व्हीजेएनटीडीसीएल) यांचेशी संबधित जिल्हा अहमदनगर येथे दोन लाभधारका प्रकरणी व जिल्हा जळगावमध्ये एक लाभार्थीप्रकरणी बनावट कागदपत्रे सादर केल्याचे लेखा तपासणीत निदर्शनास आल्याचे आक्षेपात नमूद केले आहे. जिल्हा व्यवस्थापक, अहमदनगर यांनी त्यांचेशी संबधित दोन प्रकरणी छाननी केली असता असे आढळून येते की, या प्रकरणी लाभधारकांना कर्ज मंजूर करताना दस्तऐवज बनावट असल्याचे निदर्शनास न आल्याने कर्जाचे वाटप झाले आहे. तथापि याबाबत त्यांनी पुनः चौकशी करून त्यामधील एका लाभधारकाचे योग्य दस्तऐवज प्राप्त करून नस्तीत ठेवले आहेत. दुस-या लाभधारकाप्रकरणी जातीचा दाखला, वय, उत्पन्न याची पडताळणी केली असता त्याच्यात खाडाखोड झाल्याचे दिसून येते. तथापि संबंधित लाभधारकांनी कर्जाची व्याजासह पूर्ण परतफेड केल्याने त्यांचे प्रकरण बंद करण्यात आले आहे. त्यामुळे त्या प्रकरणी पुढील चौकशी केलेली नाही.

जिल्हा व्यवस्थापक जळगाव यांनी खुलासा केल्याप्रमाणे त्यांचेकडील एका प्रकरणी जातीचा दाखला मा.तहसीलदार यांनी प्रमाणीत केलेला असल्याने सदर दाखला अधिकृत असल्याने कर्जाचे वाटप करण्यात आल्याचा खुलासा केलेला आहे. सन १९९५ या वर्षापर्यंत जातीविषयक दाखले देण्याचे अधिकार मा. तहसीलदार यांच्याकडे असल्याने त्यांनी दिलेला दाखला ग्राह्य असल्याचे त्यांनी पुढे स्पष्ट केले आहे.

या परिच्छेदात लेखा आक्षेप घेतल्यानुसार महामंडळाच्या सर्व जिल्हा व्यवस्थापकांनी लाभार्थीना कर्ज मंजूर करतेवेळी जात, वय व उत्पन्न याबाबत खात्री झाल्यानंतर कर्ज मंजूर करावे अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे अभिप्राय—**

अहमदनगर जिल्ह्यातील १८ लाभधारकांना रु.१५.५० लाख वित्तीय सहाय्य संवितरित केले होते. त्यापैकी ७ लाभधारक अस्तित्वात होते व उर्वरित ११ लाभधारकांनी बनावट कागदपत्रे सादर केली होती. ही बाब खरी आहे. याबाबत खुलासा करण्यात येतो की, जे ७ लाभार्थी अस्तित्वात नव्हते याबाबत (१) श्री. सुनिल महादेव नारायणकर यांनी श्री. हनुमंत केशव बोबडे यांचे नावे, (२) श्रीमती सिंधुबाई दगडू नारायणकर यांनी सौ. अरुणा वि. वाघमारे यांचे नावे, (३) श्री. कमलाकर कोंडिबा नारायणकर यांनी श्री. सुरेश बाबुराव सोनटक्के यांचे नावे, (४) श्री. विनोद जगन्नाथ त्र्यंबके यानी श्री. संजय नारायण लोखंडे यांचे नावे, (५) श्री. शशीकांत भिमराव नारायणकर यांनी श्री. दिनेश हरिभाऊ कटके यांचे नावे, (६) श्री. संतोष राजेंद्र नारायणकर यांचे नावे व (७) श्री. संतोष राजेंद्र नारायणकर यांनी सौ. निशा रामराव दोंदे यांचे नावे अनुक्रमे रु. ५०,०००, रु. १,००,०००, रु. ५०,०००, रु. १,००,०००, रु. १,००,०००, रु. ५०,००० व रु. ५०,००० या कर्ज रकमा काढण्यात आल्या होत्या. या व्यक्तींकडून ७ लाभार्थ्यांना अदा करण्यात आलेली रक्कम वसूल करण्यात येऊन त्यांना ७ प्रकरणांची बनावट कागदपत्रे सादर केल्याबाबत महामंडळाने त्यांचेविरुद्ध दावा दाखल केला आहे. तसेच ११ लाभधारकांविरुद्ध तसेच श्री. एस. डी. भोगे, विभागीय अधिकारी आणि महात्मा फुले मागासवर्गाचे जिल्हा व्यवस्थापक यांचेविरुद्ध दावा दाखल करण्यात आलेला असून सदरचे प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट आहे.

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे अभिप्राय—**

लेखापरीक्षणामध्ये निदर्शनास आल्यानुसार, तपासणी दरम्यान जिल्हा व्यवस्थापकांनी योग्य तपासणी न करता वितरण झाल्याचे मान्य केले होते त्यानंतर राष्ट्रीय व राज्य महामंडळाच्या योजनांतर्गत प्रकरणांची मंजुरी, निधी वितरणाची कार्यपद्धती परिपत्रक क्र. इमाविवि. २००५/कक्ष-२/२७७, दिनांक ४ मे २००५ अन्वये निश्चित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दीर्घमुदती, स्वर्णिमा व स्वयंसक्षम कर्ज योजनेंतर्गत निधी वितरणाची कार्यपद्धती कार्यालयीन आदेश क्र. इमाविवि. २००५/प्र.क्र./१५४५, दिनांक १० ऑक्टोबर २००५ ची प्रत सोबत जोडली आहे.

**५.३** वित्तीय सहाय्य मंजूर करताना अर्जाची सखोल छाननी करणेबाबत तसेच पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या अर्जदारांना वित्तीय सहाय्य मंजूर करणेबाबत संबंधित महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना पत्र.क्र.संकीर्ण २०१३ / प्र.क्र.३२ / महामंडळ- दि.१९.१.२०१३ अन्वये कळविण्यात आले आहे.

**५.४** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी या महामंडळांच्या कामकाजामध्ये " योग्य तपासणी न करता कर्जाचे संवितरण " याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव, संबंधित महामंडळांच्या व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने गुरूवार, दिनांक २ जानेवारी २०१४ रोजी साक्ष घेतली.

समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र. २.२.२४ मध्ये " योग्य तपासणी न करता कर्जाचे संवितरण " या संदर्भात घेतलेल्या आक्षेपासंबंधाने विचारले असता संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे वतीने अहमदनगर जिल्ह्यातील १८ लाभधारकांना रुपये १५.५० लाखांचे वित्तीय सहाय्य वितरित करण्यात आले होते त्यापैकी सात लाभधारक अस्तित्वात होते व उर्वरित ११ लाभधारकांनी बनावट कागदपत्रे सादर केली होती.

या संदर्भात बनावट कागदपत्रे सादर करून पैसे काढावयाचे व पॅरा आल्यानंतर पैसे भरावयाचे व जोपर्यंत पॅरा येत नाही तोपर्यंत पैसे वापरावयाचे हाच या मंडळींचा फॉर्म्युला दिसतो. पैसे घेणारे बनावट असू शकतात परंतु पैसे भरणारेही बनावट असू शकतात हे या प्रकरणावरुन शासनाच्या महामंडळात आज जे काही काम सुरू आहे ते चुकीच्या पद्धतीने सुरू आहे. बनावट कागदपत्र तयार करून शासनाचे पैसे घ्यावयाचे व ऑडीट पॅरा निघाल्यानंतर पैसे भरावयाचे. जोपर्यंत ऑडीट पॅरा येत नाही तोपर्यंत शासनाचे बिनव्याजाचे पैसे वापरावयाचे, सबसिडी मिळवायची. दोन लोकांनी शासनाचे १०० कोटी घ्यावयाचे व ऑडीट पॅरा आल्यानंतर हे पैसे परत भरावयाचे असेच महामंडळ व संबंधित लाभार्थ्यांचे संगनमताने काम सुरू असल्याचे यावरून स्पष्ट होते. असे समितीच्या निदर्शनास आले असून समिती याबाबत अहवालात योग्य ते आक्षेप नोंदवून प्रश्नाला न्याय देण्यासाठी शिफारस करील, अशाप्रकारे जे लाभार्थी पैसे घेतात व नंतर पैसे वापरून पुन्हा भरतात अशा लोकांवर आपण काय कारवाई केलेली आहे काय ? अशा लाभार्थ्यांचे अर्ज कोणत्या अधिकाऱ्याने संमत केलेले आहेत ? यामध्ये राज्य शासन पूर्णपणे सहमत आहे असे दिसते. शासनाच्या पैशाची महामंडळाच्या मार्फत लूट सुरू आहे. अशाप्रकारे जी लूट सुरू आहे त्याला कोण जबाबदार आहे ? योग्य तपासणी न करता कर्जाचे वितरण करण्यात आले आहे, असे समितीचे स्पष्ट मत आहे.

तसेच नाशिक येथील एका लाभधारकाचा व्यवसाय अस्तित्वात नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे यासंदर्भात आपण कोणती कारवाई केली आहे? त्या त्या भागातील गरीब समाजातील लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारावी यासाठी महाराष्ट्र शासनाने त्या त्या ठिकाणी महामंडळांची स्थापना केलेली आहे. परंतु अशा प्रकारे बोगस लाभार्थ्यांना फायदा देण्याचे काम शासन खपवून घेणार आहे काय ? जर बोगस लाभार्थ्यांना पैसे मिळणार असतील तर जे खरोखर मागासलेले आहेत, गरीब आहेत अशा लाभार्थ्यांना कोण पैसे देणार आहे ? महामंडळाने अशाच प्रकारे काम करावयाचे ठरवले तर कसे काय चालेल ? त्यामुळे महात्मा फुले विकास महामंडळ तसेच संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळांच्या माध्यमातून आतापर्यंत खरोखरच्या किती लाभार्थ्यांना महामंडळाने पैसे दिलेले आहेत याची माहिती अधिकारी देतील काय? अशी समितीने विचारणा केली असता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, सदर लाभार्थ्यांकडून ९३ हजार रुपये वसूल करण्यात आलेले

आहेत. सदर लाभार्थ्याला २.०५ लक्ष रुपये कर्ज देण्यात आले होते त्यापैकी आतापर्यंत ९३ हजार रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. या योजनेचा लाभ देत असतांना लाभार्थ्याला सुरूवातीलाच १० हजार रुपयांची सबसिडी देण्यात आली होती, अशी माहिती दिली यावर समितीने विचारले की, सदर लाभार्थ्यांकडून आपल्याला एकरकमी वसुली करता येईल काय? यावर संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी होय, असे उत्तर दिले, या संदर्भात समितीच्या मते डॉक्टरकी हा व्यवसाय नाही. सदर लाभार्थ्याला कोणत्या कारणास्तव कर्ज देण्यात आले होते? असे विचारले असता यावर महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सदर लाभार्थ्याला सायबर कॅफेसाठी लोन देण्यात आले होते, अशी माहिती दिली.

कर्ज घेतल्यानंतर लाभार्थ्याने व्यवसाय सुरू केला नसल्याचे लक्षात आल्यानंतर किमान त्याच्याविरुद्ध कारवाई करणे अपेक्षित होते असे समितीने विचारले असता महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी उत्तर दिले की, त्यांच्याकडून कर्ज वसूल करणार आहोत. मुद्दल व व्याज मिळून १,१३,५०० रुपये वसूल करावयाचे असून त्यापैकी ९३,९६३ रुपये वसूल केलेले आहेत. त्यावर एखाद्या प्रकरणासंदर्भात माझ्याकडून चूक झालेली आहे, मी कर्जाची रक्कम पूर्णतः भरेन असे त्या लाभार्थ्याकडून लिहून घेता येईल का? अशी समितीने विचारणा केली असता महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी असे लिहून घेता येईल, असे समितीला सांगितले या संदर्भात समितीने २००५ मध्ये सायबर कॅफे सुरू करण्याकरिता कर्ज दिले असताना लाभार्थ्यांने कर्ज रकमेचा योग्य विनियोग केला की नाही याची तपासणी जिल्हा व्यवस्थापक किंवा महामंडळाचे निरीक्षक यांनी मागील १० वर्षांच्या काळात का केली नाही? याबाबत स्पष्टीकरण विचारले असता व्यवस्थापकीय संचालक यांनी उत्तर दिले की, त्यांनी लेखी लिहून दिले की, मला पोलीस विभागाकडून त्रास होत असता मी सायबर कॅफेऐवजी ऑटोमोबाईल स्पेअर पार्टचा व्यवसाय सुरू करीत आहे. या लाभार्थ्याला २.२५ लाख रुपये कर्ज मंजूर झाले होते. त्यापैकी ३९ हजार रुपये वसूल झाले असून १.१८ लाख रुपये कर्जमाफी झाली आहे. ९६,३०० रुपये इतकी रक्कम अद्याप प्रलंबित आहे.

**५.५ अभिप्राय व शिफारस—**

भारताचे नियत्रंक व महालेखापरीक्षक यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ व इतर महामंडळांच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र.२.२.२४ मध्ये "योग्य तपासणी न करता कर्जाचे संवितरण" याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीला साक्षीच्या वेळी मिळालेली लेखी व तोंडी माहिती विचारात घेता असे दिसून येते की, **संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे वतीने अहमदनगर जिल्ह्यातील १८ लाभधारकांना रुपये १५.५० लाखांचे वित्तीय सहाय्य वितरित करण्यात आले होते. त्यापैकी सात लाभधारक अस्तित्वात होते व उर्वरित ११**

लाभधारकांनी बनावट कागदपत्रे सादर केली होती. बनावट कागदपत्रे सादर करून पैसे काढावयाचे व महालेखाकारांनी महामंडळाच्या अहवालावरती आक्षेप घेईपर्यंत पैसे वापरायचे हा कर्ज घेणाऱ्या लोकांचा व्यवसाय झाला आहे. जोपर्यंत महालेखाकार आक्षेप घेत नाहीत तोपर्यंत शासनाचे पैसे बिनव्याजी वापरायचे व सवलत मिळवायची, अशाप्रकारे महामंडळाचे अधिकारी व लाभार्थी यांच्या संगनमताने शासनाच्या निधीच्या रकमेचा गैर प्रकार सुरू आहे, असे समितीचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे खरोखरच मागासलेल्या गरीब लाभार्थ्यांना या शासनाच्या योजनेचा लाभ मिळत नाही.

एखाद्या लाभार्थीनी व्यवसाय बदलला तर त्या लाभार्थ्याला पैसे वापरता येत नाहीत, असे असताना महामंडळाकडून अधिकाऱ्यांच्या संगनमताने लाभार्थ्यांना कर्ज देण्यात आले आहे व त्यांना सवलत देखील देण्यात आली आहे. अशा कर्जदारांनी व्यवसाय सुरू केले की नाही याची दहा वर्षांच्या काळात जिल्हा निरीक्षकाने साधी तपासणी देखील केल्याचे दिसून येत नाही. ही बाब योग्य नसून खरीच चिंताजनक आहे. यावरून कार्यक्षमतेचा अभाव निश्चितच स्पष्ट होत असून निष्काळजीपणा असल्याचे दिसून येते, याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

तरी शासनाच्या निधीचा भविष्यकाळात योग्य वापर होण्यासाठी महामंडळांच्या संचालक मंडळांनी पूरेपूर दक्षता घ्यावी. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ व इतर महामंडळांच्या वतीने ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये बनावट कागदपत्रे सादर करून लाभार्थ्यांनी कर्ज घेतले आहे अशा लाभार्थ्यांकडून एक रकमी व्याजासह कर्ज वसूल करण्यात यावे तसेच ज्या व्यवस्थापकीय संचालकाने कागदपत्रांची योग्य तपासणी न करता कर्ज वितरित केले आहे, त्यांची विभागीय चौकशी करून अशा अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. या प्रकरणी करण्यात आलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

**सहा - मालाच्या प्राप्तीबद्दल खात्री करून न घेताच पुरवठाकाराला संवितरण—**

६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-०६ च्या प्रकरण क्रमांक २ मध्ये परिच्छेद क्रमांक २.२.२८ मध्ये "मालाच्या प्राप्तीबद्दल खात्री करून न घेताच पुरवठाकाराला संवितरण" या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, कंपन्यांच्या संवितरण पद्धतीनुसार, लाभधारकांना पुरवायच्या मालासंबंधी पुरवठाकाराला प्रदान करण्यापूर्वी, लाभधारकांना प्रत्यक्ष मालाची पोहचवणी झाली होती की नाही व पुरवठाकार विक्रीकर विभागाकडे नोंदविलेले होते की नाही याबाबतची तपासणी करणे आवश्यक होते :

परंतु, लेखापरीक्षण छाननीमध्ये असे निदर्शनास आले की, सर्वच्या सर्व पाच कंपन्यांच्या, पुणे प्रादेशिक कार्यालयांनी २० लाभधारकांच्या संबंधित ३४ पुरवठाकारांना माल मिळालेला नसतानाही रुपये १५.३३ लाखाचे प्रदान केले होते. हे पुरवठाकार विक्रीकर विभागाकडे नोंदविलेले नव्हते.

लेखापरीक्षण छाननीत पुढे असेही निदर्शनास आले की, पाच कंपन्यांनी औरंगाबाद, बीड, नाशिक व पुणे जिल्हयामधील ११* पुरवठाकारांना लाभधारकांना माल पुरवठा करण्यासाठी रुपये १.२५* कोटींचे प्रदान केले होते. ह्या मालाची प्रत्यक्ष पोहचवणी लाभधारकांना झाली की नाही याबाबत कंपन्यांनी खात्री करून घेतली नव्हती. त्यामुळे या ११ पुरवठाकारांची कंपनी कर्मचा-यांसोबत संयुक्त तपासणी केली असता असे आढळून आले की हे पुरवठाकार अस्तित्वात नव्हते. लाभधारकांना प्रत्यक्ष माल मिळाला की नाही याबाबतच्या कागदपत्रांच्या अभावी वित्तीय सहाय्य प्रत्यक्षपणे लक्षित लाभधारकांना मिळाले की नाही याबाबत लेखा परीक्षणात तपासणी करता आली नाही.

एलएसएबीएसडीसीएलच्या व्यवस्थापनाने म्हटले होते (नोव्हेंबर,२००५ व ऑगस्ट,२००६) की, ह्या मुद्याची नोंद घेण्यात आली व चुका करणाऱ्या कर्मचा-यांविरुद्ध कारवाई सुरू करण्यात येईल. व्हीजेएनटीडीसीएलच्या व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै २००६) भविष्यात अशा चुका टाळण्यासाठी पद्धती बळकट करण्यात येईल.

* बीड बी.आर.एन्टरप्रायजेस, औरंगाबाद, संदीप एन्टरप्रायजेस, बालाजी ट्रेडर्स, रामकृष्ण एन्टप्रायजेस, राधिका एन्टरप्रायजेस, सरिता कलेक्शन, शुभांगी मल्टी सर्व्हीसेस, पुणे व्ही.एम.मार्केटींग, नाशिक.सुगंधा कलेक्शन, संदिप आर.

* एमपीबीसीडीसीएल-(१६ लाभधारक रुपये २०.७७ लाख) एलएमएबीएमडीसीएल-(२३ लाभधारक रुपये ९.७५ लाख) व्हीजेएनटीडीसीएल-(पाच लाभधारक रुपये ९ लाख) एसआरएलआय व सीडीसीएमएल (आठ लाभधारक रुपये ९.५० लाख) व एमआरआयएमव्हीव्हीएव्हीएमएल-(११५ लाभधारक रुपये ७६.४३ लाख).

### ६.२ महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे अभिप्राय—

(१) सदर ३४ पुरवठाधारक हे किरकोळ व्यापारी असून ते स्वतः ठोक व्यापाऱ्यांकडून माल खरेदी करतात. सदरचे ठोक व्यापारी पुरवठाधारक हे स्वतः विक्रीकर भरतात. सदरच्या २० लाभधारकांनी किरकोळ व्यापाऱ्यांकडून दरपत्रके घेतलेली होती. त्यामुळे किरकोळ व्यापाऱ्यांना विक्रीकर भरण्याची आवश्यकता नाही. अर्जदार हे स्थानिक रहिवाशि असल्याने ते किरकोळ व्यापाऱ्यांकडून माल खरेदी करतात. सदर अर्जदारांनी किरकोळ पुरवठाधारकांकडून माल मिळाल्याचे जिल्हा कार्यालयास सांगितलेले होते.

(२) महामंडळाने अर्जदारांच्या संमतीनेच किरकोळ व्यापाऱ्यांकडून घेतलेल्या दरपत्रकानुसार निधीचे वितरण केलेले आहे.

(३) सदर अर्जदारास शासन निर्णय, क्र. बैठक.२००९/ प्र.क्र.२७/भाग-२, दिनांक १ जुलै २०१० अन्वये कर्जमाफी योजनेचा लाभ दिलेला असून त्यांचे कर्ज खाते बंद केलेले आहे. सदर अर्जदारास पुरवठाधारकाकडून माल मिळाल्याचे संबंधित लाभधारकांनी जिल्हा कार्यालयास येऊन सांगितले आहे.

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे अभिप्राय—**

सदर परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे पुरवठादार अस्तीत्वात नसताना नागपूर व बीड जिल्ह्यामध्ये पुरवठादारास प्रदाने करण्यात आले आहेत. या कालावधीत संबंधित जिल्हा व्यवस्थापक, श्री. र. गं. दरबस्तेवार यांची विभागीय चौकशी करण्यात आली आहे. चौकशी अहवाल व्यवस्थापकांकडे प्राप्त झालेला असून येत्या संचालक मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात येणार असून संबधित जिल्हा व्यवस्थापकाला कोणती शिक्षा करावयाची याबाबत संचालक मंडळाचे बैठकीत सदर प्रकरण ठेवण्यात आले आहे.

लाभधारकांना ज्या व्यवसायासाठी/ मालासाठी सवितरण करण्यात आले होते त्यांची उपयोगिता प्रमाणपत्रे किंवा सवितरण पश्चात निरीक्षण करण्यात आले नव्हते. सदर बाबीची महामंडळाकडून पुनर्रावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे अभिप्राय—**

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (व्हीजेएनटीडीसीएल) संबंधित आक्षेपांबाबत संबंधित जिल्हा व्यवस्थापकांनी खालील प्रमाणे केला आहे.—

(१) औरंगाबाद जिल्हा व्यवस्थापकाने खुलासा केल्यानुसार शुभांगी मल्टी सर्विसेस या पुरवठदाराकाकडून मालाचा पुरवठा करण्याकरिता तीन लाभधारकांना कर्जाचे वितरण करण्यात आले होते. त्यानुसार त्यांना मालाचा पुरवठा झालेला आहे. व त्या लाभधारकांनी कर्जाची पूर्णपणे फेड केलेली आहे. आक्षेपात नमूद केलेल्या उर्वरित १) संदिप एन्टरप्राईजेस २) सरीता एन्टरप्राईजेस ३) एम. के. ऑटोमोबाईल ४) राधिका एन्टरप्राईजेस ५) रामकृष्ण एन्टरप्राईजेस ६) बालाजी ट्रेडर्स या पुरवठाधारकांना मालाचा पुरवठा करण्याकरिता कर्ज वितरित करण्यात आलेले नाही.

(२) बीड - बी. आर . एन्टरप्राइजेस या पुरवठादाराला मालाचा पुरवठा करण्याकरीता या महामंडळाकडून निधी वितरित करण्यात आलेला नाही.

(३) नाशिक - आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे नाशिक जिल्ह्यातील १) के. जी. एन. एन्टरप्राईजेस २) सुंगधा कलेक्शन ३) संदिप रायदरे क्षत्रीय यांचे कडून माल खरेदी करण्याकरिता या महामंडळाकडून लाभधारकांना कर्जाचे वाटप झालेले नाही. ४) पुणे व्ही. एस. मार्केटींग या पुरवठादाराचे नावाने लाभधारकाला मालाचा पुरवठा करण्याकरिता या महामंडळाकडून कर्जाचे वाटप झालेले नाही.

उपरोक्त जिल्हा व्यवस्थापकांनी केलेला खुलासा ग्राहय समजण्यात यावा.

**संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे अभिप्राय—**

महामंडळाने औरंगाबाद, बीड, नाशिक, पुणे या जिल्ह्यातील ८ पुरवठादारांना माल पुरवठा करण्यासाठी रु. ९.५० लाख इतकी रक्कम अदा केली. महामंडळाने सदर लाभार्थ्यांच्या वतीने पुरवठादारास रक्कम अदा केली असून सदर लाभार्थी त्या रकमेची परतफेड विहित मुदतीत करीत आहे. त्यामुळे प्रत्येक लाभार्थ्याला देण्यात आलेल्या रकमेचा लाभ दिलेला आहे असे दिसून येते.

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे अभिप्राय—**

लेखापरीक्षणात निर्दर्शनास आलेल्या औरंगाबाद, बीड येथील या अनियमिततेबाबत महामंडळाने मुख्यालयातील ३ वरिष्ठ अधिकाऱ्यांची महाव्यवस्थापक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून त्याची प्राथमिक चौकशी करण्यात आली. त्यामध्ये अस्तित्वात नसलेल्या व अपात्र पुरवठादारांच्या माध्यमातून कर्जवाटप करण्याची बाब निदर्शनास आली. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली आहे.

६.३ याबाबत महामंडळाच्या सर्व व्यवस्थापकीय संचालकांना पत्र लिहिण्यात आले असून,—

१. पुरवठादार विक्रीकर विभागाकडे नोंदणीकृत असल्याची खातरजमा करण्यात आली होती किंवा कसे

२. माल प्राप्त झालेला नसताना पुरवठादार प्रदाने कशी करण्यात आली

३. पुरवठादार अस्तित्वात आहेत किंवा कसे याबाबतचे अभिप्राय व

४. अनियमिततेस जबाबदार असलेले अधिकारी व त्यांचेविरुद्ध करण्यात आलेली कारवाई याबाबत माहिती मागविण्यात आलेली आहे.

५. तसेच, भविष्यात अशी अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

६.४ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी या महामंडळांच्या कामकाजामध्ये "मालाच्या प्राप्तीबद्दल खात्री करून न घेताच पुरवठाकाराला संवितरण" याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायाबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव, संबंधित महामंडळांचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने गुरुवार, दिनांक ८ जानेवारी २०१४ रोजी साक्ष घेतली.

महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्रमांक २.२.२८ मध्ये "मालाच्या प्राप्तीबद्दल खात्री करून न घेताच पुरवठाकाराला संवितरण" या संदर्भात घेतलेल्या आक्षेपासंबंधाने समितीने अशी विचारणा केली की, लाभधारकांना पुरवावयाच्या मालासंबंधी पुरवठाकाराला प्रदान करण्यापूर्वी, लाभधारकांना प्रत्यक्ष मालाची पोहचवणी झाली होती की नाही व पुरवठाकार विक्रीकर विभागाकडे नोंदणीकृत होते की नाही या बाबतची तपासणी करणे आवश्यक होते.

ज्या पुरवठादाराकडून माल घेण्यात आला त्यातील काही पुरवठादार विक्रीकर विभागाकडे नोंदणीकृत नव्हते. राज्यात विक्रीकर आकारला जात होता. आता मूल्यवर्धित कर म्हणजेच व्हॅट लागू झालेला आहे. ज्या व्यापाऱ्यांची २.५ लाख रुपयांच्या वर उलाढाल होणाऱ्या व्यापाऱ्यांना नोंदणी करणे बंधनकारक होते. या प्रकरणात २० लाभधारक असून एकूण ३४ पुरवठादार होते. पुरवठादारांनी मालाचा पुरवठा केलेला नसताना सुद्धा त्यांना १५.३३ लाख रुपयांचे प्रदान करण्यात आलेले आहे असा लेखापरीक्षणातील मुख्य आक्षेप आहे. पुरवठादार हा विक्रीकर विभागाकडे नोंदणीकृत असावयास पाहिजे ही अट सुरूवातीला टाकण्याची आवश्यकता होती.

लाभधारकांनी पुरवठादारांकडून माल मिळाल्याचे तोंडी सांगितले असेल आणि ते महामंडळाने रेकॉर्डवर घेतले असेल तर ते योग्य नाही. कारण तोंडी सांगण्याला काही आधार नसतो. मुळात या संदर्भातील सर्व कार्यवाही लेखी स्वरुपात असावयास पाहिजे होती. लाभधारकांना माल मिळाल्याबाबतच्या पावत्या घेण्याची आवश्यकता आहे. शासनाने या प्रकरणी अनियमितता झाल्याचे नमूद करून अनियमिततेस जबाबदार असलेले अधिकारी व त्यांच्यावर करण्यात आलेली कारवाई याबाबत माहिती द्यावी. त्यावर शासनाकडून सचिवांनी सांगितले लाभधारकांना माल मिळाल्याची खात्री न करताच पेमेंट केले गेले असा मुख्य आक्षेप लेखा परीक्षणात होता.

मुळात अशा प्रकारची खरेदी करताना जे डीलर विक्रीकर विभागाकडे नोंदणीकृत आहेत त्यांच्याकडूनच खरेदी करावी असे आपण सांगावयास पाहिजे होते. नाही तर जाणूनबुजून एका डीलरकडून खरेदी करण्याऐवजी १५-२० किरकोळ व्यापाऱ्यांकडून खरेदी करण्यास सांगितले जाईल. कारण किरकोळ व्यापाऱ्यांची विहित मर्यादेपर्यंत उलाढाल राहणार नाही आणि ते सर्व प्रक्रियेतून आपोआप सुटतील. यापुढे सर्व खरेदी नोंदणीकृत पुरवठादारांकडूनच करावी असा नियम सर्व महामंडळाना लागू करणार काय ? असे समितीने विचारले असता यावर विभागीय प्रतिनिधी यांच्याकडून होय, अशा सूचना खालच्यास्तरावर दिलेल्या आहेत, असे सांगण्यात आले.

या संदर्भात लेखी सूचना देऊन त्या बाबतची प्रत समितीला सादर करावी. तसेच माहिती पुस्तिकेतील पृष्ठ क्रमांक-६५ वर महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाच्या अभिप्रायामध्ये "लेखा परीक्षणात निदर्शनास आलेल्या औरंगाबाद, बीड येथील अनियमिततेबाबत महामंडळाने मुख्यालयातील ३ वरिष्ठ अधिकाऱ्यांची महाव्यवस्थापक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून, त्या संदर्भात प्राथमिक चौकशी केली. त्यामध्ये अस्तित्वात नसलेल्या व अपात्र पुरवठादारांच्या माध्यमातून कर्जवाटप करण्याची बाब निदर्शनास आली. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली आहे." असे नमूद केले आहे. अशाप्रकारे अनियमितता करणारे अधिकारी कोण आहेत आणि त्यांच्यावर महामंडळाने कोणती कारवाई केली ? असे समितीने विचारले असता महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, यांनी सांगितले की, अनियमिततेस जे अधिकारी जबाबदार आढळून आले ते औरंगाबाद येथील होते. त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळांतर्गत पुरवठा करण्यात आलेला माल लाभार्थ्यांना मिळालेला नव्हता. प्रत्यक्षात मालाचा पुरवठा झालेला नसतानासुद्धा पुरवठादाराला देयक अदा करण्यात आलेले आहे आणि या बाबतीतच चौकशी सुरू आहे, असे विभागीय सचिव यांनी स्पष्ट केले.

मालाचा पुरवठा झालेला नसताना सुद्धा देयक अदा केल्याची बाब महामंडळाच्या निदर्शनास आल्यानंतर महामंडळाने ही बाब फसवणूक असल्यामुळे संबंधितांवर भारताचे दंड संहितेनुसार गुन्हा का दाखल केला नाही ? असे समितीने विचारले असता याबाबत महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचे

व्यवस्थापकीय संचालक, यांनी सांगितले की, या प्रकरणी जबाबदार असलेल्या एका अधिकाऱ्यावर एफआयआर दाखल करण्यात आलेला असून, सदरहू अधिकारी सद्यःस्थितीत निलंबित आहे.

**६.५ अभिप्राय व शिफारस :—**

भारताचे नियत्रंक व महालेखापरीक्षक यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व इतर महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र.२.२.२८ मध्ये 'मालाच्या प्राप्तीबद्दल खात्री करून न घेताच पुरवठाकाराला संवितरण' याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीने साक्ष घेताना निदर्शनास आलेली वस्तुस्थिती विचारात घेता असे दिसून येते की, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, या महामंडळाच्या लाभधारकांना पुरवावयाच्या मालाच्या संबंधी रक्कम पुरवठाकाराला प्रदान करण्यापूर्वी लाभधारकाला प्रत्यक्ष मालाची पुरवणी झाली होती की नाही तसेच संबंधित पुरवठाकार विक्रीकर विभागाकडे नोंदणीकृत होते की नाही, याबाबतची तपासणी करणे आवश्यक होते.

**ज्या व्यापाऱ्यांची २.५ लाख रुपयांच्या वर उलाढाल होते अशा व्यापाऱ्यांनी नोंदणी करणे बंधनकारक होते. या प्रकरणात २० लाभधारक असून एकूण ३४ पुरवठादार होते. पुरवठादारांनी मालाचा पुरवठा केलेला आहे की नाही याची महामंडळाने कोणतीही पोच घेतलेली नाही. तोंडी सांगण्याला काही आधार नसतो. मुळात या संदर्भात सर्व कार्यवाही लेखी स्वरुपात असायला पाहिजे होती. लाभधारकांना माल मिळाल्याबाबतच्या पावत्या उपलब्ध नाहीत, असे असतानासुद्धा पुरवठाकारांना अशा प्रकारे १५.३३ लाख रुपयांचे प्रदान करण्यात आलेले आहे, लाभधारकांना माल मिळाल्याची खात्री न करताच प्रदान केले गेले आहे. असे समितीला सादर केलेल्या माहितीवरून दिसून येते. सदरची बाब योग्य नसून याप्रकरणी निष्काळजीपणा झाला असल्याचे समितीचे मत आहे.**

**तसेच अस्तित्वात नसलेल्या व अपात्र पुरवठादारांना कर्ज पुरवठा करण्यात आल्याची बाब निदर्शनास येते. अशा प्रकारे शासनाची व महामंडळाची याप्रकरणी अनियमितता झाली असल्याने जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर भारतीय दंड संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**सात - लाभधारकांच्यावतीने थेट खरेदी :-**

**७.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-०६ च्या प्रकरण क्रमांक २ मध्ये परिच्छेद क्रमांक २.२.३२- मध्ये **"लाभधारकांच्या वतीने थेट खरेदी"** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, महाराष्ट्र सरकारच्या निर्देशानुसार (नोव्हेंबर, १९९५) कंपनीची भूमिका खरेदी करण्यासाठी वित्तीय सहाय्य देणे एवढीच मर्यादित होती व कंपनीने लाभधारकांच्यावतीने खरेदी करावयाची नव्हती. या शासकीय निर्देशांचे उल्लंघन करून एलएसएबीएसडीसीएलने १०० झेरॉक्स

मशीन्स खरेदी करण्याबाबतचा मागणी आदेश दिला होता व पुरवठाकारांकडून कोणतीही हमी न घेता पुरवठाकाराला ९० टक्के अग्रिमाची रुपये ८०.६४ लाखाची रक्कम प्रदान (ऑक्टोबर, २००२) केली होती. लेखा परीक्षणात असे निदर्शनास आले की, पुरवठाकाराने ३३ मशीन्सचा पुरवठा केला नव्हता व रुपये २८.२२ लाखाची रक्कम पुरवठाकाराकडेच पडून होती. (मार्च, २००६) व्यवस्थापनाने म्हटले होते (ऑगस्ट, २००६) की,

पुरवठाकाराविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली होती. शासकीय निर्देशांचे का उल्लंघन करण्यात आले व अग्रिम देण्यापूर्वी हमी कां घेण्यात आली नाही याबाबत उत्तरात काही म्हटले नव्हते.

**७.२ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे अभिप्राय —**

सदर परिच्छेदात नमूद केल्यानुसार लाभधारकांना त्यांच्याच पसंतीने यंत्र सामग्री/साहित्य खरेदी करून द्यावयाचे शासनाचे आदेश आहेत.

सदर कालावधीत तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांच्या मर्जीतील कंपनीकडून १०० झेरॉक्स मशीन खरेदी केलेली आहे. सदर झेरॉक्स कंपनीसोबत करार करताना त्यांना अग्रीम देण्यापूर्वी पुरवठाकाराकडून कोणतीही हमी न घेता पुरवठादारास ९० % अग्रीम देण्यात आले आहे. ही बाब सत्य आहे. पुरवठाकाराने ३३ मशीनचा पुरवठा न केल्यामुळे त्यांचेकडून रु.२८.२२ लाख रक्कम पुरवठाकाराकडे पडून आहे. ती रक्कम मिळणेबाबत महामंडळाने वारंवार संबंधिताकडे पत्र व्यवहार केलेला आहे. सदर पत्र व्यवहारास संबंधित कंपन्यांकडून प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांचे विरुद्ध औरंगाबाद आयुक्तांकडे जानेवारी, २०१०च्या पत्रान्वये गुन्हा नोंदविलेला आहे. तसेच मुंबई आयुक्तांकडे देखील जानेवारी, २०१० च्या पत्रान्वये संबंधित कंपन्या विरुद्ध गुन्हा दाखल केलेला आहे. सोबत पत्रांची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे.

७.३ लाभधारकांच्या वतीने महामंडळाने खरेदी करणे ही प्रक्रिया चुकीची आहे. पुरवठादाराने ३३ मशीन्सचा पुरवठा न करणे तसेच रु.२८.२२ लाख इतकी रक्कम परत न करणे याबाबत पुरवठादारांविरुद्ध महामंडळाने गुन्हा दाखल केला आहे.

७.४ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी या महामंडळांच्या कामकाजामध्ये "लाभधारकांच्या वतीने थेट खरेदी" याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायाबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव, संबंधित महामंडळांचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने गुरुवार, दिनांक ८ जानेवारी, २०१४ रोजी साक्ष घेतली.

समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये घेतलेल्या आक्षेपासंबंधाने अशी विचारणा केली की, यंत्रसामग्री/साहित्य करून द्यावयाचे शासनाचे आदेश आहेत. सदर कालावधीत तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक यांच्या मर्जीतील कंपनीकडून १०० झेरॉक्स मशीन खरेदी केलेली आहे. सदर झेरॉक्स कंपनीसोबत करार करताना त्यांना अग्रीम देण्यापूर्वी पुरवठाकाराकडून कोणती हमी न घेता पुरवठादारास ९० % अग्रीम

देण्यात आले आहे. पुरवठाकाराने ३३ मशीनचा पुरवठा न केल्याने त्यांचेकडून रुपये २८.२२ लाख रक्कम पुरवठादाराकडे पडून आहे. ती रक्कम मिळण्यासाठी सदर कंपनीकडे पत्रव्यवहार करून देखील प्रतिसाद न दिल्यामुळे संबंधित कंपन्यावर गुन्हा दाखल करून कोणती कलमे लावण्यात आली आहेत. अपहार केला आहे तर त्यांना अटक का करण्यात आली नाही. एफआयआर दाखल करून गुन्हा रजिस्टर करणे आवश्यक आहे. त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी कॅनान कंपनीने ३३ मशीनचा पुरवठा केलेला नाही. २८.२२ लाख रुपये अग्रीम रक्कम घेतली आहे. झेरॉक्स उद्योगातील कॅनान कंपनी नावाजलेली आहे, असे सांगितले.

या संदर्भात अग्रीम दिलेली ही रक्कम २८ लाख रुपये आहे, ९० टक्के रक्कम अग्रीम म्हणून देण्यात आली आहे. यामध्ये पुरवठादार व अधिकाऱ्यांचे संगनमत झालेले आहे. त्यामुळे संबंधितांवर गुन्हा दाखल करायला पाहिजे होते. ८० लाख ६४ हजार रुपये एकूण ॲडव्हान्स देण्यात आला आहे. एकूण रकमेच्या ९० टक्के रक्कम देण्यात आली आहे. या अधिकाऱ्यांनी शासनाच्या गाईडलाईन्सचे पालन केले नाही. यामध्ये अपहार झालेला आहे. असे समितीचे स्पष्ट मत आहे.

हा विषय महालेखापरीक्षकांच्या परिच्छेदामध्ये उपस्थित केला नसता तर ३३ मशीनचा पुरवठा झाला नसता व ही रक्कम हडप करण्यात आली असती. त्यामुळे याप्रकरणी दोषी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे. तसेच बँक गॅरंटी घेण्याबाबत शासनाचे नियम काय आहेत, त्यानुसार किती रकमेच्यावर बँक गॅरंटी घेतली पाहिजे, असे समितीने विचारले असता संबंधित अधिकाऱ्यांवर व पुरवठादारांवर एफआयआर दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल, असे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, यांनी सांगितले. शासनाचे नियमांचे उल्लघन करून महामंडळाचे अधिकारी व पुरवठादार यांनी संगनमत केले असून रकमेचा अपहार केल्याने संबंधित अधिकारी व पुरवठादार यांच्यावर एफआयआर नोंदवून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, असे समितीने निर्देश दिले.

**७.५ अभिप्राय व शिफारस :-**

भारताचे नियत्रंक व महालेखापरीक्षक यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व इतर महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र.२.२.३२ मध्ये "लाभधारकांच्या वतीने थेट खरेदी" याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीने साक्ष घेताना निदर्शनास आलेली वस्तुस्थिती विचारात घेता असे दिसून येते की, **लोकशाही अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ व इतर महामंडळाच्या कामकाजासाठी १०० झेरॉक्स मशीन खरेदी करण्याबाबतचा मागणीचा आदेश दिला होता परंतु मागणी करताना सदर झेरॉक्स कंपनीसोबत करार करताना त्यांना अग्रीम देण्यापूर्वी पुरवठाकाराकडून कोणती हमी न घेता पुरवठादारास ९० % अग्रीम देण्यात आले आहे. तरी देखील ३३ मशीनचा पुरवठादाराकडून पुरवठा झालेला नाही. अग्रीम म्हणून रुपये २८.२२ लाख**

**इतकी रक्कम पुरवठादाराकडे पडून आहे. ती रक्कम मिळण्यासाठी सदर कंपनीकडे पत्रव्यवहार करून देखील प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे संबंधित कंपन्यांवर गुन्हा दाखल करावयाला पाहिजे होते परंतु पुरवठादार व अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. जर महालेखाकारांनी संबंधित परिच्छेद उपस्थित केला नसता तर ३३ मशीनचा पुरवठा झाला नसता व सदर रक्कमेचा अपहार झाला असता असे समितीला वाटते. याप्रकरणी शासनाच्या नियमाचे उल्लंघन करून महामंडळाच्या रकमेचा अपहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर व पुरवठादारावर फौजदारी गुन्हा दाखल करावा व सदर तोटयांची रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात यावी.**

**तसेच शासनाच्या उच्च पदस्थांनी अशा अधिकाऱ्यांना पाठीशी न घालता अशी प्रकरणे लक्षात येताच कडक कारवाईची अंमलबजावणी केल्यास अशा गोष्टीवर शासनाची वचक राहील. महामंडळाचा कारभार पारदर्शी असावा म्हणून प्रत्येक खाते प्रमुखांने बारकाईने लक्ष घालावे म्हणजे भविष्यात अशी प्रकरणे घडणार नाहीत व याप्रकरणी करण्यात आलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**आठ - अपात्र लाभधारकाला अवर्धनक्षम प्रकल्पासाठी संवितरण :-**

८.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-०६ च्या प्रकरण क्रमांक २ मध्ये परिच्छेद क्रमांक २.२.३३- मध्ये "अपात्र लाभधारकाला अवर्धनक्षम प्रकल्पासाठी संवितरण" या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार वित्तीय सहाय्य बीपीएल लाभधारकाला मंजूर करावयाचे होते. लेखापरीक्षण छाननीत असे निदर्शनास आलेली एमपीबीसीडीसीएलने मनीष मोरे नावाच्या लाभधारकाला ज्याचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न प्रतिवर्ष रुपये १०.२० कोटी एवढे होते त्याला हॉटेल व्यवसायासाठी रुपये २४.६४ लाखाचे वित्तीय सहाय्य संवितरित (२००१ ते २००२) केले होते. हे वित्तीय सहाय्य अवर्धनक्षम प्रकल्पासाठी मंजूर करण्यात आले होते कारण प्रकल्पाचा अंतर्गत परतावा दर (इन्टरनल रेट ऑफ रिटर्नर्) कर्जदारापेक्षा कमी होता व लाभधारकाला या क्षेत्रामधील कोणताही मागील अनुभव नव्हता. वित्तीय सहाय्य बीपीएल लाभधारकाला मंजूर करणे आवश्यक होते. अशा रितीने, वित्तीय सहाय्य अपात्र लाभधारकाला अवर्धनक्षम प्रकल्पासाठी देण्यात आले होते.

त्या व्यतिरिक्त दोन लाभधारकांनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालाच्या आधारावर एलएसएबीएसडीसीएलने लक्झरी बसेस खरेदी करण्यासाठी रुपये २६.११ लाखाचे वित्तीय सहाय्य संवितरित केले होते. प्रकल्प अहवालांच्या लेखापरीक्षण छाननीत असे निदर्शनास आले की अंतर्गत परतावा दर ऋण होता व त्यामुळे हे प्रकल्प वित्तीयदृष्ट्या अवर्धनक्षम होते. त्याचप्रमाणे कंपनीच्या औरंगाबाद क्षेत्रीय कार्यालयाने एका लाभधारकाला पिकअप व्हॅन खरेदी करण्यासाठी रुपये १.१६ लाखाचे वित्तीय सहाय्य संवितरित केले होते. लेखापरीक्षणामध्ये असे निदर्शनास आले की खरेदी करण्यात आलेले वाहन लाभधारकांच्या नावाने नोंदणीकृत केलेले नव्हते.

**८.२ महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे अभिप्राय—**

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. बैठक-२००९/ प्र.क्र.२७/भाग-२/विघयो-२, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२, दिनांक १ जुलै, २०१० व शासन निर्णय क्रमांक बैठक-२००९/प्र.क्र.२७/विघयो-२, दिनांक २ जुलै, २०१० अन्वये दिनांक ३१ मार्च २००८ पूर्वी थकित असलेल्या कर्जास माफी देण्याचा निर्णय जाहिर केलेला आहे. सदर निर्णयाच्या अंतर्गत परिच्छेदामध्ये नमूद लाभधारकांना कर्जमाफी देण्यात आली आहे. तथापि अर्जदाराने रु.२०,००० चे उत्पन्न असलेला उत्पन्नाचा दाखला तहसीलदार, चिखली, जिल्हा बुलढाणा यांचा दाखला कर्ज प्रकरणांसाठी कर्ज मागतांना सादर केलेला आहे. त्यांनी हॉटेल व्यवसायाचा अनुभव असल्याचे बारा महिन्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यांनी नागपूर पुणे हायवेवर जी जागा व्यवसायासाठी निवडलेली आहे त्या ठिकाणी व्यवसाय चांगल्या प्रकारे चालू शकतो असा प्रमाणित प्रकल्प अहवाल महामंडळास सादर केला आहे. त्यामुळे प्रकल्प वर्धनक्षम आहे असे धरून प्रकल्प एनएसएफडीसी कडे शिफारस करण्यात आला होता. प्रकल्प मंजूर करणा-या संस्थेनी एनएसएफडीसीनी सर्व बाबींची खात्री करून मंजुरी व निधी वितरण केल्यामुळे कर्जाचे वितरण करण्यात आले.

उर्वरित मुद्दा हा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाशी संबंधित असल्यामुळे अभिप्राय निरंक आहे.

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे अभिप्राय —**

सदर परिच्छेदात नमूद केल्यानुसार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत लक्झरी बसेस खरेदी करण्यासाठी रक्कम रु.२६.११ लाखाचे वित्तीय सहाय्य संवितरीत केले आहे.

एनएसएफडीसी योजने अंतर्गत त्यांच्या प्रचलित योजनेनुसार एनएसएफडीसी यांनी त्यांचा वैयक्तीक प्रस्ताव वर्धनक्षम असल्याने प्रकल्प अहवाल व इतर वैधानिक दस्ताऐवजांची पाहणी केल्यानंतरच एनएसएफडीसी यांनी सदर प्रकरणात मंजूरी दिलेली आहे.औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयामार्फत ०१ लाभधारकाला पीकव्हॅन खरेदी करण्यासाठी रक्कम रु.१.१६ लाख रकमेचे वित्तीय सहाय्य संवितरीत केले होते. ही बाब सत्य असून सदरचे वाहन सदर लाभार्थीचे नावे करून देण्यात आलेली आहे. सोबत एनएसएफडीसी यांना सादर केलेल्या विनियोजन अहवालाची प्रत जोडलेली आहे.

**८.३** आक्षेपात उल्लेख केलेल्या प्रस्तावांना एनएसएफडीसी ने मान्यता दिली आहे. तरीसुद्धा वित्तीय सहाय्य अर्जाची कर्ज मंजूर करताना सखोल छाननी करून सर्व निकषांची पूर्तता करणाऱ्या अर्जदारांनाच वित्तीय सहाय्य मंजूर करण्यात यावे असे व्यवस्थापकीय संचालकांना कळविण्यात आले आहे.

८.४ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी या महामंडळांच्या कामकाजामध्ये "अपात्र लाभधारकाला अवर्धनक्षम प्रकल्पासाठी संवितरण" याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायाबाबत सामाजिक न्याय व विशेष

सहाय्य विभागाचे सचिव, संबंधित महामंडळांचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने गुरुवार, दिनांक ८ जानेवारी,२०१४ व बुधवार, दिनांक १५ जानेवारी,२०१४ रोजी साक्ष घेतली.

समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्रमांक २.२.३३ मध्ये अपात्र लाभधारकाला अवर्धनक्षम प्रकल्पासाठी संवितरण यासंदर्भात घेतलेल्या आक्षेपासंबंधाने विचारले असता महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, या योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार वित्तीय सहाय्य बीपीएल लाभधारकाला मंजूर करायचे होते. लाभधारक मनीष मोरे यांच्या कुटुंबाचे उत्पन्न १०.२० कोटी रुपये एवढे दाखविले होते. परंतु त्यासंदर्भात कोणताही पुरावा आढळून आलेला नाही. तथापि सदर लाभधारकाला कर्जमाफी देण्यात आली असून अर्जदाराने रुपये २०,०००/- चे उत्पन्न असल्याचा उत्पन्नाचा दाखला तहसिलदार यांच्याकडे कर्ज प्रकरणासाठी सादर केला आहे. त्यानुसार या लाभधारकास अर्थसहाय्य देण्यात आले होते. या अर्जदाराने हॉटेल व्यवसायासाठी नागपूर-पुणे हायवेवर जागा निवडलेली आहे. त्या ठिकाणी व्यवसाय चांगला चालू शकतो असा अहवाल महामंडळास सादर केला आहे. त्यामुळे हा व्यवसाय वर्धनक्षम आहे असे गृहित धरून एनएसएफडीसीने निधीचे वितरण केले आहे. सदर अर्जदाराने व्यवसाय सुरू केला होता व शासनाने त्यांना पहिला हप्ता दिला होता. हा व्यवसाय ३० लाख रुपयांचा होता. त्यापैकी २४.६० लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले आहे. एनएसएफडीसीने ३ लाख रुपयांचा हप्ता रोखून ठेवला आहे. त्या व्यतिरिक्त दोन लाभधारकांनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालाच्या आधारावर एलएसएबीएसडीसीएलने लक्झरी बसेस खरेदी करण्यासाठी रुपये २६.११ लाखाचे वित्तीय सहाय्य संवितरित केले होते. प्रकल्प अहवालांच्या लेखा परीक्षण छाननीत असे निदर्शनास आले की अंतर्गत परतावा दर ऋण होता व त्यामुळे हे प्रकल्प वित्तीयदृष्ट्या अवर्धनक्षम होते. त्याचप्रमाणे कंपनीच्या औरंगाबाद क्षेत्रीय कार्यालयाने एका लाभधारकाला पिकअप व्हॅन खरेदी करण्यासाठी रुपये १.१६ लाखाचे वित्तीय सहाय्य संवितरित केले होते. लेखापरीक्षणामध्ये असे निदर्शनास आले की खरेदी करण्यात आलेले वाहन लाभधारकांच्या नावाने नोंदणीकृत केलेले नव्हते.

लाभार्थ्यांना हॉटेल व्यवसायासाठी नागपूर-पुणे हायवेवर निवडलेल्या जागी हॉटेल सुरू करण्यास दिलेल्या अर्थसहाय्याच्या आधारे सदरहू प्रोजेक्ट सुरू झाला का ? अशी समितीने विचारणा केली असता महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या प्रतिनिधी यांच्याकडून सांगण्यात आले की, व्यवसाय सुरू झालेला नाही. त्याने पेमेंट करावे याकरिता नोटिसेस दिलेल्या आहेत. त्याला कर्जमाफीच्या योजनेतून कर्जमाफी दिलेली नाही. या संदर्भात कलम १३८ प्रमाणे कारवाई करण्याबाबतची महामंडळाची भूमिका आहे. २०,०००/- रुपये वार्षिक उत्पन्नाचा दाखला दिल्याने त्याचा बीपीएलमध्ये समावेश होता म्हणून लाभार्थ्यांस कर्ज दिले.

२० हजार रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीला २४.६४ लाखांचे कर्ज मंजूर केले आहे. हे पैसे त्याच्याकडून कसे काय वसूल करणार, त्याचे उत्पन्न कमी असल्याने तो कर्जाची परतफेड कशी करणार? उद्या हे प्रकरण कोर्टामध्ये गेले तर,.कोर्टही त्याच्याच बाजूने निर्णय देईल. त्यामुळे लाभधारकाला त्याच्या उत्पन्नाप्रमाणेच कर्ज दिले पाहिजे. असे समितीचे मत असून याबाबत विभागाची प्रतिक्रिया काय आहे? त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी सांगितले की, लाभधारकाला कर्ज देताना अशी अपेक्षा असते की, त्याने सुरू केलेल्या उद्योगातून कर्जाची परतफेड करावी. अनेक केसेसमध्ये दारिद्र्यरेषेखालील लोकांना कर्ज दिलेले असून त्यांनी आपल्या व्यवसायातून कर्जाची परतफेड केलेली आहे. ही एकच केस चुकीची म्हणून समोर आलेली आहे की, ज्यामध्ये त्याने प्रोजेक्ट पूर्ण केलेला नाही, त्यामुळे त्याचा शेवटचा हप्ता थांबविलेला आहे. फिजीबिलीटी म्हणजे त्याने केवळ दिलेले प्रोजेक्ट पेपर्सच पाहिले जातात काय ? असे समितीने विचारले असता त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी एनएसएफडीसीचे २१ लाख ५४ हजार रुपयांचे कर्ज, महात्मा फुले मागासवर्ग महामंडळाचे ६ लाख रुपयांचे भागभांडवल, ६ हजार रुपयांचे अनुदान व अर्जदाराचा सहभाग २ लाख ४० हजार रुपये अशा प्रकारे हा एकूण ३० लाख रुपयांचा प्रकल्प आहे. हॉटेलची इमारत उभी राहिली आहे. परंतु, काही अडचणींमुळे त्याला व्यवसाय सुरू करता आला नाही. या योजनांमध्ये मिळणारा निधी केंद्र शासनाकडून मिळतो. या कर्जाची परतफेड न झाल्यास कर्ज माफी देतो. परंतु, यामुळे प्लॅनिंग कमिशनकडून पुढच्या कर्जाच्या बाबतीत नकारात्मक शेरे मिळतात.

एखाद्या लाभार्थी कर्जमाफीकरिता पात्र आहे का ? याबाबतचे निष्कर्ष काय आहेत ? असे समितीने विचारले असता महात्मा फुले विकास महामंडळाचे प्रतिनिधी यांना कर्जाची सर्वच रक्कम माफ होत नाही. तर सन २००८ पर्यंतचे देय हप्ते कर्जमाफीला पात्र आहेत. असे सांगितले त्यावर समितीने महालेखाकारांनी त्या व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न १०.२० कोटी रुपये आहे असे कोणत्या आधारावर नमूद केले आहे? असे विचारले असता वरिष्ठ लेखापरीक्षा अधिकारी (वाणिज्यिक) यांनी सांगितले की, लाभार्थ्यांने प्रोजेक्ट रिपोर्ट सादर केलेला आहे. त्यातील काही कागदपत्रानुसार त्यांची केरोसीनची डिलरशिप होती. त्यावेळी वार्षिक उत्पन्न ८५ लाख रुपये एवढे असल्याबाबतची सर्व माहिती आहे. यावर समितीने त्याच्या उत्पन्नाच्या बाबतीत अशी कॉन्ट्रोव्हर्सी का दिसते? अशी विचारणा केली असता महालेखाकारांनी तहसिलदाराने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र असल्यास त्याला चॅलेंज न करता त्या आधारे निर्णय घेण्यात येतो अशी माहिती दिली. त्याबाबत समितीने विचारले की, त्यांनी सादर केलेल्या प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये स्वतःची केरोसीन एजन्सी असल्याचे नमूद केले आहे, तसेच बॅलन्सशीट जोडली आहे

तसेच या प्रकरणातील लाभार्थ्याने हॉटेल व्यवसाय सुरू करण्यासाठी ३० लक्ष रुपये अर्थसहाय्याची मागणी महामंडळाकडे केली होती. महामंडळाने लाभार्थ्याचा हिस्सा वगळून २७.६० लक्ष रुपये अर्थसहाय्य लाभार्थ्यास द्यावयाचे होते. लाभार्थ्याने अर्जाबरोबर सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये तहसिलदारांनी दिलेल्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र होते. त्यानुसार लाभार्थ्यांचे त्यावेळचे मासिक उत्पन्न २० हजार रुपये एवढे होते. सन २००१-२००२ मध्ये लाभार्थ्यास रु.२४.६० लक्ष एवढे अर्थसहाय्य संवितरित करण्यात आले. त्यानंतर

लाभार्थ्याने हॉटेलचे काम सुरू केले होते व त्यानुसार त्यांनी दिनांक ४ ऑक्टोबर २००५ रोजी रु.२२.०० लक्ष एवढ्या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र महामंडळास सादर केले आहे. त्या सोबतच लाभार्थ्याने रु.१३.७२ लक्ष एवढ्या अतिरिक्त रकमेचे अर्थसहाय्य महामंडळाने मंजूर करावे, अशा प्रकारची मागणीही केली होती. ही मागणी सादर करीत असताना या अतिरिक्त रकमेसाठी स्वतःच्या भावाला जामीनदार दाखवून, भावाच्या उत्पन्नाचा दाखला जोडला होता. भावाला केरोसिनची एजन्सी मिळाली असून त्याचे मासिक उत्पन्न ८५ लक्ष रुपये आहे, असे दाखविण्यात आले होते. लाभार्थ्यांच्या भावास सन २००३ मध्ये एजन्सी मिळाली आहे, भावाचे स्वतंत्र कुटुंब असून मासिक उत्पन्न ८५ लक्ष रुपये असल्याचे दाखविले असे महात्मा फुले विकास महामंडळाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

लाभार्थ्याच्या ज्या भावाला एजन्सी मिळालेली आहे, तो भाऊ लाभार्थ्याच्या प्रकल्पात 'बिझनेस पार्टनर' आहे का, लाभार्थ्याला अर्थसहाय्य करीत असताना जामीनदार घेण्याची पद्धत आहे का असे समितीने विचारले, असता महात्मा फुले विकास महामंडळाचे प्रतिनिधी यांनी लाभार्थ्याचा भाऊ प्रकल्पात 'बिझनेस पार्टनर' नाही. फक्त, अतिरिक्त अर्थसहाय्य मंजूर व्हावे, या दृष्टीकोनातून लाभार्थ्याने स्वतः अर्थसहाय्याची रक्कम भरली नाही तर भाऊ सर्व रक्कम अदा करील, यासाठी भावाच्या उत्पन्नाचा दाखला जोडला आहे. अर्थसहाय्यासाठी जामीनदार घेण्याची पद्धत महामंडळात नाही. त्याचप्रमाणे लाभार्थ्याने केलेल्या मागणीनुसार महामंडळाने अतिरिक्त अर्थसहाय्य मंजुरही केलेले नाही. उलटपक्षी रु.२७.६० लक्ष रुपये अर्थसहाय्यापैकी केवळ २४.६० लक्ष रुपये लाभार्थ्यास प्रत्यक्षात संवितरित करण्यात आले असून मूळ रकमेतील ३ लक्ष रुपये अद्याप दिलेले नाहीत, असे स्पष्ट केले.

अतिरिक्त अर्थसहाय्यासाठी जामीनदार म्हणून भावाच्या उत्पन्नाचा दाखला जोडणे, ही बाब कार्यपद्धतीत नसल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करू शकतो. परंतु, प्रश्न हा आहे की, साधारणपणे ९० टक्के अर्थसहाय्याची रक्कम प्रत्यक्षात प्राप्त होऊनदेखील लाभार्थ्याचा व्यवसाय का सुरू होऊ शकला नाही, याबाबतच्या कारणांचा शोध महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी घेतला आहे का असे समितीने विचारले असता, महात्मा फुले विकास महामंडळाचे प्रतिनिधी यांनी प्रकल्पस्थळाच्या आजुबाजूच्या जमीन मालकांशी लाभार्थ्याचे काही वाद उत्पन्न झाले होते. या संदर्भातील दावा उच्च न्यायालयामध्ये होता. या दाव्याचा निकाल लाभार्थ्याच्या बाजूने लागला आहे, अशीही माहिती आम्हाला मिळाली आहे. परंतु, जमीन मालकांशी असलेले वाद, न्यायालयीन वाद यामुळे विहित मुदतीत प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. हा प्रकल्प पूर्णत्त्वास जावा, यासाठी लाभार्थ्याने अतिरिक्त अर्थसहाय्याची मागणी केली आहे. असे सांगितले.

सामाजिक न्याय विभागाच्या योजना विविध वर्गातील लोकांना मदत करण्यासाठी, त्यांना आयुष्यात उभे करण्यासाठी सुरू केलेल्या आहेत. त्यामुळे तांत्रिक बाबींचा विचार करीत असतानाच प्रकल्प सुरू न होण्याची कारणे संयुक्तिक व वस्तुस्थितीवर आधारलेली असतील तर सकारात्मक विचार करून प्रकल्प सुरू होण्यासाठी मदत केली पाहिजे. व्यवसाय सुरूच झाला नसेल तर लाभार्थी परतफेड कशी करणार

असे समितीने विचारले याबाबत विभागीय प्रतिनिधी यांनी सांगितले की, समितीने केलेली सूचना अतिशय योग्य आहे. एका बाजूला होतकरू तरुणाला रोजगाराची संधी मिळावी, यासाठी महामंडळाने अर्थसहाय्य वितरित केले आहे. प्रकल्प सुरू न झाल्यामुळे महामंडळाची मोठी रक्कम या प्रकरणात अडकलेली आहे. रक्कम वसूल करण्यासाठी पुन्हा न्यायालयीन दावा किंवा अन्य कायदेशीर बाबीचा अवलंब करावा लागणार आहे आणि त्यामध्ये महामंडळाचा वेळ, शक्ती व पैसाही जाणार आहे. त्यामुळे समितीने सांगितल्याप्रमाणे लाभार्थ्यास मदत केली, व्यवसाय सुरू झाला तर त्या तरुणाला खऱ्या अर्थाने उभे राहण्यासाठी मदत केल्याचे समाधानही मिळेल व महामंडळाची थकित रक्कमही वसूल होऊ शकेल.

**८.५ अभिप्राय व शिफारस :—**

भारताचे नियत्रंक व महालेखापरीक्षक यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व इतर महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र.२.२.३३ मध्ये 'अपात्र लाभधारकाला अवर्धनक्षम प्रकल्पासाठी संवितरण' याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीने साक्ष घेताना निदर्शनास आलेली वस्तुस्थिती विचारात घेता असे दिसून येते की, अपात्र लाभधारकाला अवर्धनक्षम प्रकल्पासाठी संवितरण या योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार वित्तीय सहाय्य बीपीएल लाभधारकांना मंजूर करावयाचे होते. महामंडळाने हॉटेल व्यवसायासाठी, लक्झरी बसेस खरेदीसाठी व पीकअप व्हॅन खरेदीसाठी कर्जे मंजूर केली होती. परंतु हॉटेल व्यवसायासाठी कर्ज मंजूर करण्यात आलेल्या लाभधारकाला या क्षेत्रामधील कोणताही अनुभव नव्हता तसेच लक्झरी बसेस व पीकअप व्हॅन खरेदी केलेली वाहने लाभधारकांच्या नावाने नोंदणीकृत केलेली नव्हती, असे समितीच्या निदर्शनास आले आहे.

**सामाजिक न्याय विभागामार्फत विविध महामंडळाकडून शासकीय योजना राबविण्यात येतात. योजनेचा मुख्य उद्देश विविध मागासवर्गातील लोकांना मदत करण्यासाठी असतो. त्यांना आयुष्यात आर्थिकदृष्ट्या उभे करण्यासाठी शासनाच्या योजना सुरू केलेल्या आहेत. त्यामुळे तांत्रिकबाबींचा विचार करीत असताना प्रकल्प सुरू न होण्याची कारणे संयुक्तिक व वस्तुस्थितीवर आधारलेली असतील तर सकारात्मक विचार करून प्रकल्प सुरू होण्यासाठी मदत केली पाहिजे. परंतु या प्रकरणामध्ये लाभधारकास कोणतेही तांत्रिक कारण नसताना देखील प्रकल्प सुरू न झाल्याने महामंडळाची मोठी रक्कम या प्रकरणात अडकलेली आहे. रक्कम वसूल करण्यासाठी पुन्हा न्यायालयात दावा किंवा अन्य कायदेशीर बाबींचा अवलंब करावा लागणार आहे. त्यामध्ये महामंडळाचा वेळ शक्ती व पैसा जाणार आहे. शासकीय योजनेची उद्दिष्टे साध्य होत नाही. या योजनेमध्ये मिळणारा केंद्र शासनाच्या निधीची परतफेड न झाल्यामुळे नियोजन आयोगाकडून पुढे कर्ज मिळणे देखील शक्य होत नाही. यासाठी लाभधारकांना वित्तीय सहाय्य मंजूर करताना अशा प्रकारांची पुनरावृत्ती होणार नाही, हे ध्यानात घेऊन सखोल छाननी सुरू करून सर्व निकषांची पूर्तता करणाऱ्या अर्जदारांना वित्तीय सहाय्य मंजूर करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे तसेच**

**कर्ज वितरण कार्यपद्धती बळकट करण्यासाठी महामंडळांनी व सामाजिक न्याय विभागांनी याकडे जातीने लक्ष देणे गरजेचे आहे. जेणेकरून जास्तीत जास्त गरीब लाभार्थ्यांना या योजनेद्वारे कर्ज उपलब्ध होऊ शकेल, याकडे दुर्लक्ष करणाऱ्या व निकषांचे उल्लंघन करून कर्ज मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाईचे धोरण अवलंबण्यात यावे. लाभार्थ्यांकडून दिलेले कर्ज व्याजासह वसूल करण्यात यावे व याप्रकरणी करण्यात आलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**नऊ - ५० टक्के अनुदान सीमांत निधी (मार्जिन मनी) योजने अंतर्गत वित्तीय सहाय्य :—**

**९.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-०६ च्या प्रकरण क्रमांक २ मध्ये परिच्छेद क्रमांक २.२.३४ मध्ये **'५० टक्के अनुदान सीमांत निधी (मार्जिन मनी) योजने अंतर्गत वित्तीय सहाय्य'** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की,—

* बीपीएल कुटुंबामधील लक्षित लाभधारकांना मदत करण्याच्या हेतूने भारत सरकार विशेष केंद्रीय सहाय्य (एससीए) योजना अंमलबजावीत करणाऱ्या संस्थांमार्फत राबवीत होती. या योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार खालील तरतुदी होत्या.—

* ५० टक्के अनुदान योजनेनुसार, प्रकल्पाची किंमत रुपये २०,००० पर्यंत मर्यादित होती. त्यापैकी ५० टक्के रक्कम जास्तीत जास्त रुपये १०,००० कंपनीने बँकेमार्फत लाभधारकाला अनुदान म्हणून द्यावयाची होती व उर्वरित ५० टक्के रक्कम जास्तीत जास्त रुपये १०,००० बँकेने लाभधारकाला कर्जरूपाने द्यावयाची होती. सीमांत निधी योजनेअंतर्गत प्रतिलाभधारकाला जास्तीत जास्त रुपये १०,००० एवढे अनुदान देय होते.

* एमपीबीसीडीसीएलकडून मिळालेली रक्कम बँकेने लाभधारकाच्या कर्ज खात्यात जमा करून अनुदान व बँक कर्जाची रक्कम एकत्रितपणे लाभधारकाला संवितरित करणे आवश्यक होते.

* लाभधारकांना संवितरित करण्यात आलेल्या वित्तीय सहाय्यामधून तीन टक्के सेवा आकार वसूल करावयाचा होता.

**लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की,—**

* परंतु एमपीबीसीडीसीएलने २००१-०५ या कालावधीत ६३,०१६ लाभधारकांना रुपये ५९.१२ कोटींचे अनुदान ५० टक्के अनुदान योजने अंतर्गत मंजूर केले. रक्कम लाभधारकांना संवितरित करण्यासाठी बँकांना दिली होती. त्याच कालावधीत बँकांनी फक्त रुपये १०.८९ कोटींची कर्जे लाभधारकांना संवितरित केली होती. अशारीतीने रुपये ४८.२३ कोटी (रुपये ५९.१२ कोटी रुपये १०.८९ कोटी) जे बँकांना संवितरणासाठी दिले होते ती रक्कम बँकेकडेच पडून होती. परंतु भारत सरकारला ती रक्कम योजने अंतर्गत संवितरित केली म्हणून कळविण्यात आली होती. बॅकांनी अनुदानाची रक्कम लाभधारकांना संवितरित केली की नाही याबाबत कंपनीने खात्री करून घेतली नव्हती. यामुळे भारत सरकारला

चुकीची माहिती कळविण्यात आली व त्यामुळे निधी बँकेकडेच पडून राहिला व योजनेचे उद्दिष्टही साध्य झाले नव्हते.

* एमपीबीसीडीसीएलने सीमांत निधी योजने अंतर्गत, २००५-०६ या कालावधीत ८२९ लाभधारकांना रुपये २.८० कोटींचे अर्थसहाय्य संवितरित केले होते. योजनेनुसार प्रत्येक लाभधारकाला देय असलेली अनुदानाची जास्तीत जास्त रक्कम रुपये १०,००० एवढी होती. त्यामुळे ८२९ लाभधारकांना देय असलेली अनुदानाची रक्कम फक्त रुपये ८२.९० लाख एवढीच येत होती. योजने अंतर्गत अतिरिक्त प्रदानाची कारणे एकतर कागदोपत्री नोंदीवर उपलब्ध नव्हती किंवा त्याबाबत कंपनीने कोणतेही स्पष्टीकरण दिले नव्हते.

* तीन कंपन्यांनी लाभधारकांकडून रुपये ३.२३ कोटी सेवा आकाराची वसुली केली नव्हती. भारत सरकारच्या निर्देशांचे उल्लंघन करून सेवा आकाराची वसुली न करण्याची कारणे कागदोपत्री उपलब्ध नव्हती.

* एमपीबीसीडीसीएल रु.१.६६ कोटी, एलएसएबीएसएडीसीएल रु.१.०९ कोटी व एसआरएलआय व सीडीसीएमएल रु.४८ लाख.

९.२ महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे अभिप्राय—

* अनुदान योजने अंतर्गत बँकांनी कर्ज प्रकरणास मंजुरी दिल्यानंतर मंजूर रकमेच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रु. १०,०००/-अनुदान बँकेकडे एकूण कर्ज वितरणासाठी पाठविण्यात येते. त्यामध्ये बँकेचा सहभागदेखील अनुदानाबरोबर वितरित करावा असे लेखी निर्देशदेखील बँकेला देण्यात येतात.

* विशेष केंद्रीय योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार एकूण वितरित झालेल्या रकमेवर ३ टक्के सेवा आकार महामंडळास वाहिनीकृत यंत्रणा म्हणून मिळण्याची नियमात तरतूद आहे. महामंडळास ज्या ज्या वेळी केंद्र शासनाकडून विशेष-केंद्रीय सहाय्य प्राप्त झाले आहे त्या त्या वेळी सदर रकमेतून ३ टक्के सेवा आकार महामंडळाच्या आस्थापना व प्रशासन खाती वळता करण्यात आला आहे. सदर निधी या योजनेच्या अंमलबजावणीसाठी येत असलेल्या खर्चासाठी वापरण्यात आला आहे. लेखा परीक्षणात नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक प्रकरणी लाभधारकांना अनुदान संवितरित करताना पुन्हा पुन्हा असा सेवा आकार वळता करण्याच्या पद्धतीमध्ये उद्भवणारी किचकटता यामुळे महामंडळास टाळणे शक्य झाले आहे.

सन २००१-०५ या कालावधीमध्ये लेखापरीक्षणात नमूद केल्याप्रमाणे रक्कम रुपये ५९.१२ कोटी ही लाभार्थींना अनुदान म्हणून वाटप करण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकेमार्फत वितरित करण्यात आली होती. सदर लेखा परीक्षणामध्ये बँकांनी स्वतःचा हिस्सा म्हणून केवळ रु.१०.८९ कोटी संवितरित केल्याचे नमूद केले आहे व उर्वरित बँकांचा हिस्सा वाटप झाला नसल्याचे नमूद केले आहे.

याबाबत बँकांकडून अशारीतीने स्वतःचा हिस्सा वाटप न झाल्याची तपासणी करण्यात येत आहे व यापुढे बँकाही स्वतःचा हिस्सा महामंडळाच्या हिश्श्याबरोबर संवितरित करतील अशी कार्यपद्धती बळकट करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणी लेखा परीक्षणास दिलेली माहिती चुकीची होती. प्रत्यक्षात सन २००५-०६ या वित्तीय वर्षामध्ये माहे डिसेंबर २००५ अखेरपर्यंत जी रक्कम रुपये २.८० कोटीचे वितरण करण्यात आले आहे ते बीज भांडवलाचे असून अनुदानाचे नाही. या ८२९ लाभधारकांना या बीज भांडवला समवेतच रक्कम रुपये ८१ लाख इतके अनुदान देण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी कोणतीही अतिरिक्त प्रदाने झाली नाही याची खात्री करण्यात आली आहे. या महामंडळाने सेवा आकाराची वसुली सुरूवातीलाच केली असून ती लाभधारकांकडून वसुल करावयाची नियमात तरतूद नाही.

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे अभिप्राय —**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार महामंडळाने शासनातर्फे प्राप्त निधींपैकी (अनुदान योजने अंतर्गत) ३ टक्के रक्कम प्रशासकीय खर्चासाठी विनियोजन केलेली आहे. मात्र अनुदान व बीज भांडवल योजनेतील वितरणामध्ये अशा प्रकारची रक्कम वितरित करताना वजावट केलेली नाही.

**संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे अभिप्राय —**

सदर योजनेचे काम महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळाकडून या महामंडळाकडे वर्ग करण्यात आले. या महामंडळाकडे सदर योजनेसाठी कर्मचारी वर्गही नवीन घेण्यात आला होता. त्यामुळे अजागता सेवा आकार वसूल करण्यात आला नव्हता. लेखापरीक्षणानंतर म्हणजे ऑगस्ट २००६ पासून ३ टक्के सेवाआकार वसुल करण्यात येत आहे. शा.नि.सा.न्या.वि.क्र.बैठक-२००९/प्र.क्र.२७/भाग-२/विघयो-२, दिनांक १ जुलै २०१० अन्वये राष्ट्रीय महामंडळाचे/बँकांचे दिनांक ३१ मार्च २००८ अखेर थकीत कर्ज माफ करण्यात आलेले आहे.

९.३ बँकांकडून अशा रितीने स्वतःचा हिस्सा वाटप का झाला नाही याबाबत तपासणी करण्यात येत असल्याचे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने कळविले आहे. तसेच भविष्यात बँका त्यांचा हिस्सा महामंडळाच्या हिश्श्याबरोबरच वितरित करतील याबाबत कार्यपद्धती बळकट करण्यात येईल असे नमूद केले आहे. लाभधारकांकडून सेवा आकाराची वसूली का केली नाही याबाबत महामंडळाकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

९.४ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी या महामंडळांच्या कामकाजामध्ये '५० टक्के अनुदान सीमांत निधी (मार्जिन मनी) योजने अंतर्गत वित्तीय सहाय्य याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव, संबंधित महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०१४ रोजी साक्ष घेतली.

(शा.म.मु.) एचबी ४००—४ (७५०—६-२०१४)

महालेखाकारांनी लेखा परिक्षणामध्ये घेतलेल्या आक्षेपासंबंधाने बँकाकडून लाभार्थ्यांना कर्जाच्या रकमेचे वाटप का झाले नाही याबाबत तपासणी करण्यात येत आहे असे उत्तर दिले आहे. त्याचप्रमाणे कर्ज वितरणाची कार्यपद्धती बळकट करण्यात येईल असे नमूद केले आहे. हे प्रकरण २००६ चे आहे. त्यामुळे आता कर्ज वितरणाची कार्यवाही सुरळीत झाली आहे काय ? जे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले ते पूर्ण करण्यात आले आहे काय ? समितीने अशी विचारणा केली असता महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, यांनी सागितले की, बँकाचा असा अनुभव आहे की, महामंडळाकडून लाभार्थ्यांना अनुदान देण्यात आले तरी बँका तातडीने लाभार्थ्यांना कर्ज वितरित करीत नाहीत.

बँकांकडून कर्ज वितरण उशीरा होत आहे. यासाठी बँकेचे अधिकारी, जिल्हाधिकारी व महामंडळाचे अधिकाऱ्यांची एकत्रित जिल्हा स्तरावर बैठक घेण्यात आली होती. या प्रकरणांचा आढावा घेऊन पाठपुरावा करण्यात येत आहे. ५९.१२ कोटी रुपयांची रक्कम लाभार्थ्यांना राष्ट्रीय कृत बँकाकडून अनुदान म्हणून वाटप करण्यात आली होती. ८० टक्के अनुदानाची रक्कम बँकाकडून द्यावयाची होती. त्यावेळी लेखा परीक्षणात असे आढळून आले होते की, बँकांनी केवळ १०.८९ कोटी रुपये वितरित केले आहेत. सन २००१-२००२ ते २००५-२००६ या कालावधीत बँकांनी ७७ कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली होती. त्यापैकी काही जिल्ह्यामध्ये बँकाकडून १०० टक्के रकमेचे वाटप झाले असून काही जिल्ह्यामध्ये रकमेचे वाटप झाले नाही. या संदर्भातील सविस्तर माहिती महामंडळाकडून जिल्हावाईज गोळा करण्यात येत असून अद्याप माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही. महामंडळाकडून व मुख्य कार्यालयाकडून याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. रक्कम वाटपासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना वारंवार सूचना देण्यात येत आहेत.

यावर समितीने आता बँकाकडून कर्जाचे वाटप वेळेत होते किंवा नाही ? अशी विचारणाकेली असता याबाबत विभागीय प्रतिनिधी यांनी हा प्रश्न अनुदानाचा आहे. केंद्र शासनाकडून लाभार्थ्यांना दहा हजार रुपये अनुदान देण्यात येते. जेवढी रक्कम अनुदान मिळते तेवढीच रक्कम बँकांनी कर्ज रुपाने लाभार्थ्यांना द्यावी, अशी ही योजना आहे. शासनाकडून मिळालेले अनुदान लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये जमा झाल्याशिवाय बँका कर्जाची रक्कम वितरित करीत नाहीत. लाभार्थ्यांना वेळेवर कर्ज मिळावे म्हणून महामंडळ व जिल्हाधिकारी यांच्याकडून जिल्हा बँकाकडे पाठपुरावा करण्यात येतो. तरी देखील अनेक लाभार्थ्यांना वेळेत कर्ज मिळत नाही. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना वेळोवेळी सूचना दिल्या आहेत. या सर्व व्यवहाराचे रिकन्सलिएशन वेळेत होत नसल्यामुळे यात विसंगती दिसून येते. सबसिडीची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केल्यानंतर १०० टक्के कर्ज वितरण झाले पाहिजे, असे सांगितले.

उपरोक्त दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने महामंडळाकडून अनुदानाचे वाटप झाल्यावर बँकांनी आठ दिवसात कर्जाच्या रकमेचे वितरण केले पाहिजे अशा सूचना बँकांना दिल्या पाहिजेत. कारण कर्जाची फाईल मंजूर झाल्यावर बँकेकडे कर्ज अर्ज सादर करण्यात येतात. त्यामुळे अनुदानाची रक्कम बँक खात्यात

जमा केल्यावर आठ दिवसात कर्जाचे वितरण झाले पाहिजे. या कामासाठी दोन ते तीन महिने लागतात हे बरोबर नाही. दारिद्र्य रेषेखालील लोकांनी व्यवसाय करावा म्हणून शासनाकडून अनुदान देण्यात येते. त्यामुळे बँकांनी अशा लाभार्थ्यांना वेळेत कर्जाची रक्कम दिली नाही तर तो व्यवसाय सुरू करू शकणार नाही. याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

लाभार्थी अनुदानास पात्र आहेत, त्याला अनुदान मिळाले असताना बँकेकडून कर्जाचे वितरण करण्यासाठी तीन ते सहा महिन्यांचा कालावधी लावणे अत्यंत चुकीचे आहे. कोणत्याही परिस्थितीत बँकेकडून कर्जाची रक्कम उशीरात उशीरा १० ते १५ दिवसात मिळाली पाहिजे या दृष्टीने महामंडळाचे अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी दक्षता घेतली पाहिजे. यासाठी शासनाने परिपत्रक काढून सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे ते पाठविण्यात यावे, असे निर्देश दिले.

**९.५ अभिप्राय व शिफारस :—**

भारताचे नियत्रंक व महालेखापरिक्षक यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ व इतर महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र.२.२.३४ मध्ये ५० टक्के अनुदान सीमांत निधी (मार्जिन मनी) योजनेअंतर्गत वित्तीय सहाय्य देण्यात आलेल्या अनुदानाच्या तूलनेत बँकांनी खूप कमी कर्जाचे संवितरण केले होते. याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीने साक्षीच्या वेळी याप्रकरणी समितीला मिळालेली लेखी व तोंडी माहिती विचारात घेता असे दिसून येते की, महामंडळाकडून लाभार्थ्यांना अनुदान देण्यात आले तरी बँका तातडीने लाभार्थ्यांना कर्ज वितरित करीत नाहीत. बँकांकडून कर्ज वितरण उशीरा होत आहे. यासाठी बँकेचे अधिकारी, जिल्हाधिकारी व महामंडळाचे अधिकाऱ्यांची एकत्रित जिल्हा स्तरावर बैठक घेण्यात आली होती. ५९.१२ कोटी रुपयांची रक्कम लाभार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँकाकडून अनुदान म्हणून वाटप करण्यात आली होती. ८० टक्के अनुदानाची रक्कम बँकाकडून द्यावयाची होती. त्यावेळी लेखा परीक्षणात असे आढळून आले होते की, बँकांनी केवळ १०.८९ कोटी रुपये वितरित केले आहेत. सन २००१-२००२ ते २००५-२००६ या कालावधीत बँकांनी ७७ कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली होती. त्यापैकी काही जिल्ह्यामध्ये बँकाकडून १०० टक्के रकमेचे वाटप झाले असून काही जिल्ह्यामध्ये रकमेचे वाटप झाले नाही. या संदर्भातील सविस्तर माहिती महामंडळाकडून जिल्हानिहाय गोळा करण्यात येत असून अद्याप माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही. महामंडळाकडून व मुख्य कार्यालयाकडून याबाबत पाठपुरावा करण्यात येत असल्याचे समितीस अवगत करण्यात आले आहे, ही बाब योग्य नाही.

**केंद्र शासनाकडून लाभार्थ्यांना दहा हजार रुपये अनुदान देण्यात येते. जेवढी रक्कम अनुदान मिळते तेवढीच रक्कम बँकांनी कर्ज रुपाने लाभार्थ्यांना द्यावी अशी ही योजना आहे. याबाबत समितीचे स्पष्ट मत आहे की, महामंडळाकडून अनुदानाचे वाटप झाल्यावर बँकांनी आठ दिवसात कर्जाच्या रकमेचे वितरण**

**केले पाहिजे अशा सूचना बँकांना दिल्या पाहिजेत. दारिद्र्य रेषेखालील लोकांनी व्यवसाय करावा म्हणून शासनाकडून अनुदान देण्यात येते. त्यामुळे बँकांनी अशा लाभार्थ्यांना वेळेत कर्जाची रक्कम दिली नाही तर तो व्यवसाय सुरू करू शकणार नाही, असे समितीचे मत आहे. याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.लाभार्थी अनुदानास पात्र आहेत, त्याला अनुदान मिळाले असताना बँकेकडून कर्जाचे वितरण करण्यासाठी तीन ते सहा महिन्यांचा कालावधी लावणे अत्यंत चुकीचे आहे. याबाबत समिती नाराजी व्यक्त करीत आहे. कोणत्याही परिस्थितीत बँकेकडून कर्जाची रक्कम उशीरात उशीरा १० ते १५ दिवसांत मिळाली पाहिजे यासाठी शासनाने परिपत्रक काढून सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे ते पाठविण्यात यावे. या दृष्टीने महामंडळाचे अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी दक्षता घेतली पाहिजे. जेणेकरून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना कर्जाचे वितरण उपलब्ध होऊ शकेल याकडे दुर्लक्ष करणाऱ्या व निकषांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाईचे धोरण अवलंबावे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**दहा - पायाभूत सुविधा विकासामधील अनियमितता :—**

**१०.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-०६ च्या प्रकरण क्रमांक २ मध्ये परिच्छेद क्रमांक २.२.३५- मध्ये 'पायाभूत सुविधा विकासामधील अनियमितता' या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, एससीए योजनेच्या भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार योजनेमधील १० टक्के रक्कम पायाभूत सुविधा विकासासाठी वापरायची होती. एलएसएबीएसडीसीएलकडे स्थापत्य अभियांत्रिकी कामाची अंमलबजावणी करण्यासाठी कोणताही कर्मचारीवृंद नव्हता. त्यामुळे असे स्थापत्य काम कंपनीने राज्य सार्वजनिक विभागामार्फत अंमलबजावित करावयास हवे होते. परंतु हे स्थापत्य काम खाजगी कंत्राटदारामार्फत हाती घेण्याचे कंपनीने ठरविले. नागपूर येथे सामाईक औद्योगिक इमारत बांधण्याचे काम जेव्हीएन इंजिनिअर्स ज्याने कामाचे प्राकलन बनविले होते त्यालाच देण्यात आले होते (सप्टेंबर, २००३). ज्या संस्थेने प्राकलन तयार केले त्यालाच कामाचे प्रदान करणे समर्थनीय नव्हते कारण बनविलेल्या प्राकलनाची सत्यता स्वतंत्ररित्या मूल्यमापित करण्यात आली नव्हती. त्या व्यतिरिक्त संस्था 'सी' दर्जाचा कंत्राटदार म्हणून नोंदलेली होती जे रुपये एक कोटी किंमतीपेक्षा जास्त किंमतीचे काम करण्यासाठी प्राधिकृत नव्हती. अशारितीने कंपनीने रुपये १.३१ कोटीचे काम अपात्र कंत्राटदाराला दिले होते. या प्रकल्पावर रुपये ८६.३२ लाखाचा खर्च करण्यात येऊन देखील काम अपूर्णच होते (मार्च, २००६) व्यवस्थापनाने म्हटले होते की, (ऑगस्ट, २००६) काम संचालक मंडळाच्या निर्णयानुसार जेव्हीएन इंजिनिअर्स यांना देण्यात आले होते. महाराष्ट्र सरकारने प्रत्यक्ष करण्यात आलेल्या कामाचे मूल्यमापन करण्याचे आदेश दिले होते व कंत्राटदाराविरुद्ध कारवाई करण्यात येत होती. या अनियमिततेसाठी जबाबदार असलेल्या कर्मचा-यांविरुद्ध काय कारवाई करण्यात आली याबाबत उत्तरात काहीही म्हटले नव्हते.

**१०.२ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे अभिप्राय -**

सदर परिच्छेदात नमूद केल्यानुसार विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजनेच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार योजनेमधील १०% रक्कम पायाभूत सोयी-सुविधांसाठी वापरावयाची असते.

नागपूर येथील MIDC येथे औद्योगिक इमारत बांधकामाचे मे. जेव्हीएन इंजिनियर्स, नागपूर यांना कंत्राट दिलेले होते. सदर बांधकामाची किंमत एकूण रक्कम रुपये १.३१ कोटी एवढी होती. या प्रकल्पावर रक्कम रु. ८६.३२ लाख एवढा खर्च करण्यात आला असून सदरचे काम अपूर्ण आहे ही बाब सत्य आहे.

सदर अनियमितता बाबत संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध निलंबनाची कारवाई करण्यात आली असून कंत्राटदारा विरुद्ध सुद्धा कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.

**१०.३** सदर अनियमिततेबाबत संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध निलंबनाची कारवाई करण्यात आली असून कंत्राटदाराविरुद्ध कायदेशीर कार्यवाही चालू आहे.

**१०.४** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी या महामंडळाच्या कामकाजामध्ये 'पायाभूत सुविधा विकासामधील अनियमितता' याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायाबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव संबधित महामंडळांचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने बुधवार, दिनांक १५ जानेवारी २०१४ रोजी साक्ष घेतली.

समितीने महालेखाकारांनी लेखा परिक्षणामध्ये 'पायाभूत सुविधा विकासामधील अनियमितता याबाबत घेतलेल्या आक्षेपासंबंधाने विचारले असता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, कंपनीच्या इमारत बांधकामासाठी १.३१ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते त्यापैकी ८६.३२ लाख रुपये या कामांवर खर्च करण्यात आले आहेत. सदर बांधकाम २००५-०६ मध्ये बंद पडले असल्याचे सांगितले यावर समितीने अपात्र कंत्राटदारास १.३१ कोटी रुपयांचे काम दिले असा एजी कार्यालयाचा आक्षेप होता, अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधी यांनी सांगितले की, सदर कंपनीच्या बांधकामासाठी निविदा काढून देण्यात आले आहे. ए,बी,सी अशा वर्गवारीच्या कंत्राटदारांना १.३१ कोटी रुपयांचे काम देणे आवश्यक होते. त्यावेळी श्री. झांबाडे हे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक होते. त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

१.३१ कोटी रुपयांचे हे काम होते त्यापैकी या कामावर ८६.३२ लाख रुपये खर्च करण्यात आले आहे. हे काम किती दिवसानंतर बंद पडले आहे. याबाबत खुलासा करण्यास समितीने सांगितले असता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, यांनी सन २००५-२००६ पासून हे काम बंद असल्याचा खुलासा केला. समितीने जे काम झाले आहे ते ८६ लाख रुपयांचे आहे काय ? अशी पृच्छा केली याबाबत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, यांनी सांगितले की, तेवढ्या रकमेचे प्रत्यक्षात काम झालेले नाही. समितीने एकूण बाबी लक्षात घेऊन

अशी विचारणा केली की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हे काम देण्यात आले नव्हते काय ? तसेच रुपये ८६ लाखाचे काम केले आहे, यासंदर्भात जो अधिकारी काम पाहत होता त्याला निलंबित करण्यात आले आहे. महामंडळाचे तत्कालीन एमडी यांना निलंबित करण्यात आले आहे. इतर अधिकाऱ्यांवर का कारवाई करण्यात आली नाही. सदर कंत्राटदारास ब्लॅकलिस्टमध्ये टाकले आहे काय ? त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी सांगितले की, एजी कार्यालयाचा आक्षेप अपात्र कंत्राटदारास काम दिले असा होता, त्यामुळे सदर कंत्राटदारास ब्लॅकलिस्ट करण्याचा विषय नाही. तत्कालीन एमडी यांनी या कामाची ऑर्डर काढली होती म्हणून ते जबाबदार असल्याने त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

समितीने विचारणा केली की, सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण न होता ८० टक्के रक्कम देण्यात आली आहे. यासाठी फक्त एमडी यांना जबाबदार धरून निलंबित करण्यात आले आहे. परंतु निधी देतांना कनिष्ठ अधिकाऱ्यांपासून टिप्पणी सादर झाली असणार त्यांनी निधी द्यावा असे नमूद केल्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सही केलेली आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर काम नियमानुसार व जे टप्पे सांगितले होते त्याप्रमाणे झाले किंवा नाही याचे मूल्यमापन करणे आवश्यक होते. या इमारतीचे व्हॅल्यूएशन काढण्याची आवश्यकता नाही. इस्टिमेट प्रमाणे काम झाले किंवा नाही. काम किती शिल्लक आहे अशा प्रकारची माहिती घेणे अपेक्षित आहे. कुकडे या खाजगी कंपनीकडून व्हॅल्यूएशन करण्याची आवश्यकता नाही. आज जरी व्हॅल्यूएशन प्रमाणे ७६ लाख रुपयांचे काम झाले असले तरी ते योग्य नाही. एखाद्या प्रकल्पाचे पूर्ण काम झाल्यानंतर त्याचे व्हॅल्यूएशन करण्यात येते. येथे बांधकाम पूर्ण झालेले नसल्यामुळे व्हॅल्यूएशन काढता येत नाही. त्यामुळे इस्टिमेटप्रमाणे काम झाले किंवा नाही याचा अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याकडून तपासून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणाची सविस्तर तपासणी करून संबंधित असलेल्या दोषी अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्याची आवश्यकता असल्याचे समितीचे मत आहे.

याबाबत विभागीय प्रतिनिधी यांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याकडून इस्टिमेटप्रमाणे काम झाले किंवा नाही याची माहिती घेण्यात येईल, तसेच याप्रकरणी तपासणी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

**१०.५ अभिप्राय व शिफारस :—**

भारताचे नियत्रंक व महालेखापरिक्षक यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र.२.२.३५ मध्ये पायाभूत सुविधा विकासामधील अनियमितता याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीने साक्षीच्या वेळी समितीला मिळालेली लेखी व तोंडी माहिती विचारात घेता असे दिसून येते की, नागपूर येथे सामाईक औद्योगिक इमारत बांधण्याचे कामासंदर्भात जेव्हीएन इंजिनिअर्स नागपूर यांनी कामाचे प्राकलन बनविले होते. त्यालाच औद्योगिक इमारतीचे बांधकाम देण्यात आले होते. ज्या

संस्थेने प्राकलन तयार केले त्यालाच कामाचे प्रदान करणे समर्थनीय नव्हते कारण बनविलेल्या प्राकलनाची सत्यता स्वंतत्ररित्या मूल्यमापित करण्यात आली नव्हती. संस्था 'सी' दर्जाचा कंत्राटदार म्हणून नोंदलेली होती, अशारितीने कंपनीच्या इमारत बांधकामास रुपये १.३१ कोटीचे काम अपात्र कंत्राटदाराला दिले असून या प्रकल्पावर रुपये ८६.३२ लाखाचा खर्च करण्यात येऊन देखील काम अपूर्णच असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

कंपनीच्या इमारत बांधकामासाठी १.३१ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते त्यापैकी ८६.३२ लाख रुपये या कामांवर खर्च करण्यात आले आहेत. सदर बांधकाम २००५-०६ पासून बंद पडले आहे. ८६ लाख रुपयांचे काम केले आहे. सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण न होता ८० टक्के रक्कम देण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर कामासंबंधी जे नियम व टप्पे सांगितले होते त्याप्रमाणे झाले किंवा नाही याचे मूल्यमापन करणे आवश्यक होते. एस्टिमेट प्रमाणे काम झाले किंवा नाही. काम किती शिल्लक आहे अशा प्रकारची माहिती घेणे अपेक्षित होते. कुकडे या खाजगी कंपनीकडून व्हॅल्यूएशन करण्याची आवश्यकता नव्हती. आज जरी व्हॅल्यूएशन प्रमाणे ७६ लाख रुपयांचे काम झाले असले तरी ते योग्य नाही असे समितीचे मत आहे.

**एखाद्या प्रकल्पाचे पूर्ण काम झाल्यानंतर त्याचे व्हॅल्यूएशन करण्यात येते. येथे बांधकाम पूर्ण झालेले नसल्यामुळे व्हॅल्यूएशन काढता येत नाही. त्यामुळे एस्टिमेटप्रमाणे काम झाले किंवा नाही याचा अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याकडून तपासून घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याकडून एस्टिमेटप्रमाणे काम झाले किंवा नाही याची माहिती घेण्यात यावी. व्यवस्थापकीय संचालक या वरिष्ठ अधिकाऱ्यांना जबाबदार धरून निलंबित केले असून इतर संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले नाही. तरी याप्रकरणी जबाबबदार असणाऱ्या कनिष्ठ व वरीष्ठ अधिकाऱ्यांची महामंडळाने जबाबदारी निश्चित करावी व त्यांची योग्य ती चौकशी करून दोषी असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

# बैठकीचे परिशिष्ट

## पहिली बैठक

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०१३ रोजी कक्ष क्र. १९०१, विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-०० वाजता घेण्यात आली. सदरहू बैठकीस पुढीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती**

(१) डॉ. कल्याणराव काळे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.
(३) श्री. शिरीषकुमार कोतवाल, वि.स.स.
(४) श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स.
(५) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.
(६) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.
(७) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(९) श्री. संजय दत्त, वि.प.स.
(१०) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.
(११) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. जितेंद्र भोळे, उप सचिव
(२) श्री. संतोष पराडकर, अवर सचिव

**महालेखाकार कार्यालय**

(१) श्रीमती पूनम पांडे, प्रधान महालेखाकार
(२) श्री. खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधी**

(१) श्री. आर. डी. शिंदे, सचिव, सामाजिक न्याय विभाग
(२) श्री. झाडे, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ
(३) श्री. बेनके, व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ
(४) श्री. इंगळे, व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ
(५) श्री. लोंढे, व्यवस्थापकीय संचालक, इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ
(६) श्री. चव्हाण, व्यवस्थापकीय संचालक, विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या वाणिज्यिक अहवालातील ‘ लोकशाहीर आणाभाऊ साठे विकास महामंडळ ’, ‘ महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित ’, ‘ संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळ मर्यादित ’, ‘ वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित ’ आणि ‘ महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त विकास महामंडळ मर्यादितच्या ’ यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## दुसरी बैठक

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक गुरुवार, दिनांक २ जानेवारी २०१४ रोजी दुपारी २-०० वाजता विधान भवन, कक्ष क्र. १९०१, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती**

(१) डॉ. कल्याणराव काळे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.
(३) श्री. शिरीषकुमार कोतवाल, वि.स.स.
(४) श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स.
(५) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.
(६) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.
(७) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(९) श्री. संजय दत्त, वि.प.स.
(१०) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.
(११) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.
(१२) डॉ. रणजित पाटील, वि.प.स. (निमंत्रित)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. संतोष पराडकर, अवर सचिव

**महालेखाकार कार्यालय**

(१) श्रीमती पूनम पांडे, प्रधान महालेखाकार
(२) श्री. खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधी**

(१) श्री. आर. डी. शिंदे, सचिव, सामाजिक न्याय विभाग
(२) श्री. झाडे, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ
(३) श्री. बेनके, व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ
(४) श्री. इंगळे, व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर आणणाभाऊ साठे विकास महामंडळ
(५) श्री. लोंढे, व्यवस्थापकीय संचालक, इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ
(६) श्री. चव्हाण, व्यवस्थापकीय संचालक, विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या वाणिज्यिक अहवालातील ' लोकशाहीर आणणाभाऊ साठे विकास महामंडळ ', ' महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित ', ' संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळ मर्यादित ', ' वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित ' आणि ' महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त विकास महामंडळ मर्यादितच्या ' यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## तिसरी बैठक

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक ८ जानेवारी २०१४ रोजी दुपारी २-०० वाजता विधान भवन, कक्ष क्र. १९०१, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती**

(१) डॉ. कल्याणराव काळे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.
(३) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.
(४) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.
(५) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.
(६) श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स.
(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(८) श्री. संजय दत्त, वि.प.स.
(९) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.
(१०) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. जितेंद्र भोळे, उप सचिव
(२) श्री. संतोष पराडकर, अवर सचिव

**महालेखाकार (वाणिज्यिक) यांचे कार्यालय**

(१) श्री. वेंकटरामा, उप महालेखाकार
(२) श्री. बकुल जाधव, सहायक लेखा अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधी**

(१) श्री. आर. डी. शिंदे, सचिव, सामाजिक न्याय विभाग
(२) श्री. गोपीनाथ आल्हाट, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग
(३) श्री. अविनाश झाडे, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ
(४) श्री. सदाशिव बेनके, व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ
(५) श्री. संतोष इंगळे, व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ
(६) श्री. प्रमोद चव्हाण, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक वि.जा.व भ.ज. विकास महामंडळ
(७) श्री. शरद लोंढे, व्यवस्थापकीय संचालक, इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या वाणिज्यिक अहवालातील ' लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ', ' महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित ', ' संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळ मर्यादित ', ' वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित ' आणि ' महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त विकास महामंडळ मर्यादितच्या ' यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## चौथी बैठक

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक १५ जानेवारी २०१४ रोजी विधान भवन, कक्ष क्र. १९०१, मुंबई येथे दुपारी २-०० वाजता घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती**

(१) डॉ. कल्याणराव काळे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. शिरीषकुमार कोतवाल, वि.स.स.

(३) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.

(४) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(६) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. जितेंद्र भोळे, उप सचिव

**महालेखाकार यांचे कार्यालय**

(१) श्रीमती जे. एम. चिंचखंडी,
उप महालेखाकार (वाणिज्यिक).

**विभागीय प्रतिनिधी**

(१) श्री. आर. डी. शिंदे, सचिव, सामाजिक न्याय विभाग

(२) श्री. अविनाश झाडे, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ

(३) श्री. सदाशिव बेनके, व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ

(४) श्री. संतोष इंगळे, व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ

(५) श्री. प्रमोद चव्हाण, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक वि.जा.व भ.ज. विकास महामंडळ

(६) श्री. शरद लोंढे, व्यवस्थापकीय संचालक, इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ

(७) श्री. बेग, उप महाव्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या वाणिज्यिक अहवालातील ' लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ', ' महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित ', ' संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळ मर्यादित ', ' वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित ' आणि ' महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त विकास महामंडळ मर्यादितच्या ' यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## पाचवी बैठक

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक गुरुवार, दिनांक ५ जून २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) डॉ. कल्याणराव काळे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(३) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.

(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(५) श्री. विवेक पाटील, वि.स.स.

(६) श्री. दिपक साळुंखे-पाटील, वि.प.स.

(७) श्री. रणजित पाटील, वि.प.स. (निमंत्रित)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. श्रीनिवास जाधव, विशेष कार्य अधिकारी

(२) श्री. संतोष पराडकर, अवर सचिव

(३) श्री. श्रीकांत शेटे, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारूप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई